# “णमोकार मंत्र”

## १ धर्म व संस्कृतीचे मूळ

भौतिक जगापेक्षा अध्यात्मिक सृष्टी आगळी आहे. चर्मचक्षूंनी भौतिक जगाचे वैभव पाहता येते परंतु अध्यात्मिक सृष्टीची दिव्यता, भव्यता टिपण्यासाठी अंतर्दृष्टी उजळून घ्यावी लागते. अंतर्दृष्टीला धर्माचे अंजन आवश्यक आहे. आणि संस्कृती ही धर्मकन्या आहे. संस्कृती व धर्म यांचे पितापुत्रीचे नाते अनादि परंपरेने चालू आहे. प्रायः अशी एकही संस्कृती आढळणार नाही की जिचा प्रातिनिधीक स्वरूपाचा एखदा मंत्र नाही. त्यातून आमची भारतीय संस्कृती तर अगदी मंत्रानी मंतरलेली सर्वागसुंदर आहे. जैन धर्माची परंपरा श्रमण-संस्कृतीतून प्रवाहित झाली आहे. श्रेष्ठ ऋषी-महर्षी-साधु संतानी आचरण केलेला सदाचार म्हणजेच जैन धर्म. 'जिन' हे 'निज' शब्दाचे विपरीत अपभ्रंशात्मक रूप आहे. त्या दृष्टीने निज-धर्म तोच जैन-धर्म होय. स्वतः सदाचरण करीत असतानाच विकासाची, चरमोत्कृर्षाची अवस्था जिनेंद्रांची परमोत्कृष्ठ दशा झाली आहे म्हणून ते परमेष्ठी आहेत.

रसायनाच्या एका लहानग्या गोळीत सतराशे औषधांच्या सा-या शक्ति एकवटलेल्या-एकरूप झालेल्या असतात, तव्दत एखाद्या मंत्रात सा-या धर्माचे मर्म, संस्कृतीची अचाट शक्ति संचित, ध्वनी झालेली असते. पंचपरमेष्ठीवाचक 'णमोकार' महामंत्रातसुध्दा विश्वाच्या सर्व परमोदात्त संस्कृतीची पाळेमुळे रूजलेली, गुंतलेली आहेत. सा-या धर्माचे मूळ उगमस्थान या एका ३५ अक्षरांच्या मंगल मंत्रात आहे. ऐहिक व पारमार्थिक सुखाचा मूलमंत्र म्हणजेच अपराजितेश्वर णमोकार मंत्र आहे. णमोकार मंत्र सर्व मंचाचा 'राजा' आहे. पर्वताएवढया मोठया तत्वज्ञानांचे सार म्हणजे हा मंत्र आहे. आत्म्याच्या अनंत शक्तीच्या विकासाचे बीज ही या बीजाक्षरी महामंत्रात संचित आहे. प्राणिमात्रांचे दु:ख क्षणात केवळ मंत्र-स्पर्शाने हलके हेते.

## अजब चमत्कारिक मंत्र

गुलाबासारख्या सुदर फुलांचे पृथःकरण करून छिन्नभिन्न पाकळया कुस्करून त्यांचा सुगंध येत नाही. तसेच मंत्राची चिकित्सा अथवा शब्दच्छल करून मंत्र गुणकारी होत नाहीत. मंत्राचे सारे रहस्य मांत्रिकाला गुप्त ठेवावे लागते. रहस्याचा गौप्यस्फोट करताच मंत्राची शक्ति-प्राणहीन शवाप्रमाणे क्षणात झलेली पाहतो. परंतु णमोकारमंत्र यास पूर्ण अपवाद आहे. अजब चमत्कार या मंत्राचा असा की या मंत्रासाठी कोणी 'मांत्रिक' शोधण्याची गरजच नाही. स्वतः मांत्रिक व्हा आणि अगदी गुप्तचर होउन सारे रहस्य केळीच्या पात्याप्रमाणे उकलायला लागा. अगदी उघडयावर-केव्हाही, 'अहो येता जाता वदनी वदतां, ग्रास गिळता' प्रत्येक क्रिया करताना मंत्राचा भाव-जप करा. सारे सभोवतालचे वातावरण प्रसन्न होउन जाईल ! मग कुणी स्नानादिकांनी शुचिर्भूत होउन पवित्र झालेले असो वा कुणी त्या अभावी अपवित्र असो, कुणी सुस्थितीत असो व कुणी दु:स्थितीने गांजलेले असो, कोणत्याही अवस्थेत 'मंत्र' जिवलग मित्राप्रमाणे साहाय्य करून दिलासा देईल ! मात्र श्रध्देची दिव्य ज्योत मनोमंदिरात अखंड पाजळत राहिली पाहिजे. चित्ताच्या एकाग्रतेने मंत्राचे निरांजन उजळून गेलेले पाहिजे. पंचपरमेष्ठींच्या परमात्म्यासंबधी गाढ अनुरागाचे, स्नेहाचे साजुक - तूप त्यात सुरूवातीला घातलेच पाहिजे. मानसमंदिरात अगदी भाव-निष्ठेने केलेली मंत्राची प्राणप्रतिष्ठा कुणाच्याही जीवनाला समविल्याशिवाय राहाणार नाही.

## मंत्र सामर्थ्य

जयाचे णमोकार मंत्रे अनेक I जगी जाहले मुक्त योगींद्र लोक II

अनंत जीवांनी या मंत्राचा आधार घेऊनच आपली जीवननौका संसार सागराच्या पैलतीरावर नेली आहे. मुक्तीपुरीची यात्रा अनेक ऋषी - महर्षीनी या मंत्राची साधना - तपश्चर्या करून आनंदाने केली आहे. मंत्राची आणखी आश्चर्यकारक अशी गोष्ट आहे की मंत्रसिध्द व्यक्ति पुनः कधी दु:खी

होत नाही. मुक्तीपुरीतीहून संसारात येण्याचे कारणच दुग्ध बीजाप्रमाणे संपलेले आहे. जळलेले बी कधीच उगवणार नाही. मंत्रासाधना करीत असताना कर्माची बीजे जळून भस्म होउन जातात. सा-या दु:खाचे 'राग' मूळ आहे. मंत्रसिध्द व्यक्ति 'वीतरागी' आहे. वीतरागी दशा म्हणजे अमृताहून मधूर अशा परमचैतन्याची, अक्षय सुखाची वेल. अतींद्रिय, आत्मिक सुख-समृध्दींनी बहरलेली, फळलेली सदा ताजी टवटवीत प्रसन्नता नांदविणारी अशी अध्यात्मिक सुष्टीतील अभूतपूर्व 'वीतरागी दशा' आहे. कोणत्याही प्रकारची उपमा त्या अवस्थेचे सर्वांग वर्णनास समर्पक होउ शकत नाही. वीरागी अवस्था जीवमात्रांची सहज-स्वाभविक सुंदर परिणती आहे आणि ती मात्र अनुभवगम्य आहे. आंब्याची मधुरता जशी शब्दातीत तसेच वीतरागी अवस्थेचे म्हणता येईल. चरमोत्कृष्ट परममंगल अवस्थेचा जनक णमोकर मंत्र आहे. म्हणून या णमोकार मंत्राचे महात्म्य अचिन्त्य आहे. हा महामंत्र असा आहे-

णमो अरिहंताणं । णमो सिध्दाणं । णमो आइरियाणं ।

णमो उवज्झायाणं । णमो लोए सव्वसाहूणं ॥

या मंत्रातील ५ 'पदे' सर्वोत्कृष्ट आदर्शांची प्रतीक आहेत. प्रत्येक पदारंभी 'णमो' हा शब्द आहे. नमस्कार वाचक शब्दामुळे यास 'णमोकार' मंत्र म्हणतात. मूळ अर्धमागधी भाषेतील ही रचना तीर्थंकरांच्या दिव्यध्वनीतून उमटलेली आहे. सरळ व साधा अर्थ या मंत्राचा असा आहे - लोए व सव्व ही २ पदे अत्यदीपक आहेत. लोकातील सर्व अरिहंतांना नमस्कार, लोकातील सर्व सिध्दांना नमस्त्कार, लोकातील सर्व आचार्यांना नमस्कार, लोकातील सर्व उपाध्यायांना नमस्कार, लोकातील सर्व साधूना नमस्कार, पंचपरमेष्ठींना हा नमस्कार असला तरी एखाद्याला विशिष्ट प्रकारचे कर्तृत्व सोपूवन आपल्या सा-या सुखदःखांची धुरा त्या व्यक्ति सांभाळतील व सुखाचा वाटा त्यांच्यामधील आपल्याला कांही तरी देतील व दु:खभार हलका करतील या भ्रमाने सांष्टांग नमस्कार कितीही काल अखंड घालत राहिलो तरी त्या व्यक्ति किंचीत मात्र आपल्या सुखदु:खाच्या परिणामात बदल करण्यास समर्थ होऊ शकत नाहीत. तर प्रत्येक जीवमात्र साधुदशा स्वीकारून उत्तरात्तर विकासांच्या पाय-या गाठून स्वतःचे सुख-दुःखाचे जाळे स्वतःच विणू अथवा उकलू, त्याला हवे ते करून घेऊ शकतो आणि म्हणून यातील नमस्कार स्वतःच्या अंतरात्म्याने स्वतःमधील सुप्त, अव्यक्त बीजभूत असलेल्या अखंड, निजस्वरूपी सहज सुंदर परमात्म्याला केलेले आवाहन आहे. **हे आवाहन स्वत: स्वीकारासयाचे आहे.** सुरूवातीस घेतलेले अन्या पंचपरमेष्ठीचे साहाय्य प्रासादाच्या व्दारपालार्यंतच उपयुक्त आहे. परमात्म्याच्या सम्राटाला सलामी देताना आपणच महान् सम्राट आहोत अशी खात्री मिळते आणि चैतन्याच्या सम्राटाचे अक्षय-वैभव पायाशी लोळण घेते ! हे सारे अलौकिक रहस्य या मंगल-मंत्रात साठलेले आहे. अशा अभूतपूर्व दिव्य इंगिताचा द्योतक हा मंत्र आहे. जगाला याशिवाय अन्य कोणताही मंत्र मान्य होणार नाही. मंत्रपरीक्षा करण्यासाठी कोणी गुरु-परिक्षक वा कुणी साधक शिष्य नको. हाती येईल त्याने मंत्राचा भाव टीपकागदाप्रमाणे श्रध्देने टिपून घ्यावा आणि स्वतःच्या जीवनावर प्रात्यक्षिक करून पहावे. म्हणजे मंत्राचा गुण अक्षरागणिक येत राहील.

## त्रिविधीपूर्व मंत्र

मंत्राचे बहिरंग व अंतरंग अशी दोन रूपे समजून घेतली पाहिजे. त्या दृष्टीने शब्दमंत्र, द्रव्यमंत्र व भावमंत्र या दृष्टीनी या मंत्रांचा सांगोपांग, सर्वांगसुंदर विचार पूर्वाचार्यांनी, महर्षींनी केलेला आहे. शब्दमंत्र ३५ अक्षरांचा असून त्यात स्वर व व्यंजने आलेली आहेत. शब्दमंत्राचा उच्चार समग्रतेने झाला की द्रव्यमंत्राचे शरीर तयार होते. शब्द व द्रव्यमंत्र तेव्हांच गुणकारी उपयुक्त होतो की जेव्हां भावमंत्रानी सहित असतो. भावमंत्रामध्ये चैतन्यमय परिणती मात्र असते. शब्दमंत्र दंत्य-औष्ठय-ताल्वदि वर्ण तयार करू शकतात. शारीरिक क्रियामुळे द्रव्यमंत्राचा उच्चार होऊ शकेल. पण भावमंत्राशिवाय 'मांत्रिक' होऊ शकणार नाही. त्रिविधीपूर्ण मंत्रातच त्रिविध कर्म-दोषमल हरण करण्याचे सामर्थ्य आहे. राग-व्देष-मोह हे त्रिविध कर्म-मल आहेत. 'पुत्र' अशा शब्दोच्चाराबरोबर 'पुत्रा' ची आकृतीपूर्ण शरीर रचनात्मक द्रव्य पुत्राचे चित्रातून वा प्रत्यक्ष सान्निध्य असतानाही अंत:करणात संवेदनेने भावपुत्राच्या स्नेहाचा उमाळा आल्याखेरीज मतेला पान्हा फुटत नाही. तशीच मंत्राबाबात शब्द-द्रव्य व भावपूर्णता हवी. अरिहंत, अरहंत, अर्हत्, अरूनहन्त अशी विविध रूपे

'प्रभम पदा' बद्दल प्रचीन ग्रंथात आढळतात. ती सारी रुपे सार्थ व प्रामण अशीच आहेत. पंचपरमेष्ठी स्तोत्रात या नावाबद्दल असा उल्लेख आढळतो -

अरिहाण नमो पुव्वं, अरहंताणं रहस्य रहियाणं । पयवो परमिट्ठिं, अरूहन्ताणं धुअ रयाणं ॥

व्युत्पतीच्या दृष्टीने भक्तिपाठातील श्लोक असा आहे -

मोहादि सर्व दोषरि घातकेभ्यः सदाहतरजोभ्यः । विरहितरहस्कृतेभ्यः पूजार्हेभ्यो नमोऽर्हद्भ्यः ॥

मोहनीयादि ४ घातिया कर्मदोष हेच महान् 'अरि' शत्रू आहेत. त्यांचा घात-नाश ज्यांनी केलेला आहे तेच अरिहन्त होत. अरीन् - शत्रून् घ्नन्ति इति अरिहन्ताः अशी सार्थ व्युत्पत्ति आहे. ज्ञानावरणीय, दर्शनावरणीय कर्मरूपी रज ज्यांनी धुऊन टाकली आहे ते अरहंत होत. अथवा अन्तराय कर्मरूपी रहस्याचा अभाव झालेला आहे ते अरहन्त होत. देवाधिदेव, इंद्रादिक आपल्या अलौकिक ऐश्वर्यांनी पंच कल्याणिकपूजा ज्यांची करतात जे 'अर्हत' होत.

अरिहन्त स्तुतीमध्ये अरिहन्ताची खास ३ लक्षणे सांगितली आहेत. **" जयाची महाघोर कर्मे निमाली, खरी ज्ञानदृष्टी जया प्राप्त झाली , हिताचाच जो मार्ग दावी जनाला, सदा भक्तिभावे नमू त्या जिनाला."** अर्थात् कर्मरूपी पर्वतांना भेदून चैतन्य मंदिरात स्थिरावणारे, कैवल्यज्ञानी, हितोपदेशी जिन आहेत. अरिहन्तांना नमस्कार. स्वतःच्या पूरूषार्थाने अनंत ज्ञान-दर्शन-सुख-वीर्य या अनंत चतुष्टय गुण ऐश्वर्यांची प्राप्ति करून घेतली व प्रबल पण दुष्ट कर्मशत्रूवर विजय मिळविला, स्वतः अजिंक्य-अपराजित झाले. म्हणून त्यांनाच 'जिन' असेही ओळखतात. अरिहन्त परमेष्टींचे ४६ मूल गुण आहेत. जन्माचे केवलज्ञानाचे वेळी प्रत्येकी १० अतिशय चिन्ह, देवकृत समवसरणादिक १४ अतिशय पूर्ण रचना - अष्टप्रातिहार्य व अंतिम ज्ञानादि चतुष्टय असे ४६ मूल गुण प्रगट होतात. अरिहन्तामध्ये २ प्रकारचे जीव असू शकतात. तीर्थंकर अरिहन्त व सामान्य अरिहंत. पंचकल्याणिकादि पूजायुक्त सातिशयता व धर्मतीर्थप्रवृति तीर्थंकरामध्ये विशेष असते. बाकी सर्व वैशिष्टय दोघांचे समान आहे.

रागव्देष मोरूपी त्रिपूराला नष्ट केले म्हणून कोणी यांना 'त्रिपुरारी': संसार दुःख शान्त केले म्हणून 'शंकर': केवलज्ञानाचा तिसरा अलौकिक डोळा उघडला म्हणून, त्रिनेत्रः कामक्रोधादि रिपु जिंकले म्हणून 'कामारि' अशी विविध नांवे आहेत. ब्रम्हा, विष्णु, महेश, सर्वज्ञ, आप्त, हितोपदेशी, जगन्नाथ, जगद्विभु, पुराणपुरूष इत्यादि हाजारेंची शुभ नामावली 'सहस्त्रनाम' स्तोत्रातून अनेक आचार्यांनी गाईली आहे.

## णमोकार मंत्राचे २ रे पद -

'णमो सिध्दाणं' सिध्द परमेष्ठींना नमस्कार असो. संसारी जीवच अरिहन्त दशेमध्ये योग निरोध करून जेव्हा पुरूर्षाथाची अंतिम मर्यादा आलांडतो, अर्थात अरिहन्त अवस्थेतील शेष अघातिया ४ कर्मांचा सर्वथा अभाव होतो - दुष्ट-अष्ट कर्मांचा अभाव व अष्ट गुणांची अभिव्यक्ति एकाच वेळी दीप-प्रकाशाप्रमाणे होऊन जाते, परम औदारिक शरीरापासून वेगळी 'ज्ञानशरीरी अवस्था मात्र रहाते, उर्ध्वगमन करीत लोकाच्या अग्रभागी सिध्दालयामध्ये सिध्दशिलेवर' जे जीव स्थिर होतात तेव्हां त्यांना सिध्द अथवा मुक्त जीव म्हणतात. येथेच पूर्ण विकसित स्वरूप प्रगटते. यापुढे कांही यात्रा, विकास होत रहात नाही. पूर्ण स्वतंत्र, शुध्द, कृतकृत्य, अचल-अज्ञाची ही ध्रुव शक्ती व्यक्त झाल्यामुळे रागव्देषादि कृत्रिम, विभावपरिणति नाममात्रसुध्दा या जीवाची राहिली नाही. संसारी कर्मबध्द जीवाची अनादी जडलेली राग-व्देष-मोह परिणति-सुवर्ण-पाषाणाच्या खाणीप्रमाणे आहे. पण खाणीतून सुवर्णपाषाण काढून एकदा सोने वेगळे शुध्द झाले की पुनः जसे पाषाणमय रहात नाही- सदा शुध्दच रहाते - तव्दत् 'सिध्द' जीव पुनः मलिन होऊन संसारदशा धारण करीत नाहीत. कोणत्याही कारणाने अर्थात 'संभवामी युगे युगे' असा पुनर्जन्म घेऊन अवतार रुपाने येत नाहीत. वरील विवेचनावरून गुणवत्ता, कर्मनाश सामर्थ्य या दृष्टींनी अरिहन्तापेक्षा 'सिध्द' श्रेष्ठ असताना प्रथम अरिहन्तानाच का नमस्कार केला आहे ? 'सिध्द' होताच 'ज्ञायक' अशा स्व-स्वरूपात स्थिर होतात. म्हणून सिध्दांना

लौकिक जन स्वार्थी समजतील तर तशी चूक नाही. अरिहन्त भगवान साक्षात कल्याणचा हिताचा उपदेश देत कांही काळ विहार करतात. म्हणून लौकिक दृष्टीने त्यांना जवळचा 'आप्त' समजून त्यांनाच प्रथम नमस्कार केलेला आहे. वास्तविक अरिहन्तसुध्दा निःस्वार्थपणे, निरपेक्ष राहून 'ध्वनन् शिल्पिकरस्पर्शान् मुरजः किमपेक्षते ? ' या न्यायाने त्यांच्या दिव्यध्वनीमुळे उपदेशामृताचा लाभ मिळत राहतो. म्हणून त्यांचा प्रथम क्रमांक णमोकार मंत्रात आहे.

'अरिहन्ताचा सकल परमात्मा प्रगट झालेला आहे. कारण त्या अवस्थेत परम औदारिक शरीर आहे. परन्तु जेव्हा त्याही दिव्य शरीराचा अभाव होतो - अर्थात शरीराचे सारे परमाणू कापराप्रमाणे उडून जातात व मात्र-चैतन्य प्रदेशी, निराकार, निरामय निरंजन, अनंतगुणात्मक चैतन्यपुंज राहतो - तो सिध्दांचा वि-कल परमात्मा प्रगट होतो.

## णमोकार मंत्राचे ३ रे पद -

'णमो आयरियाणं' आचार्य परमेष्ठींना तमस्कार असो. आचार्यबद्दल पंचगुरू भक्तीतून असे सांगितले आहे -

साचारश्रुतजलधीन्प्रतीर्य शुध्दोरूचरण निरतानाम् । आचार्याणां पदयुगकमलानि दधे शिरसि मेऽहम् ॥ अर्थात्- पंचविधान् आचारान् आचरन्ते इति आचार्याः । ज्ञान-दर्शन-चारित्र्य-तप-वीर्य असे पाच प्रकारचे आचार पालन करीत, व्दादशांगरूपी श्रुतज्ञानाचा सागर पार करतात, निर्दोष रीतीने ३६ मूळ गुणांना धारण करून उग्र तपश्चर्यादि करून रत्नत्रयाची स्वतः आराधना करण्यात तन्मय होतात इतरांकडून आराधना करवितात, दिक्षा-शिक्षा देउन पितृवत् वात्सल्याने शिष्य परिवाराच्या संघाच्या नेतृत्वाची धुरा उचलून धरतात. निरिच्छ, निरपेक्षतया परकल्याणाची भावना अंतरंगातून पाझरत ठेऊन उपदेश-प्रवाहाची शीतल पाणपोई साधु व श्रावकांच्यासाठी जणू खुली ठेवतात - असे विविध गुणसंपन्न, रत्नत्रयाने विशुध्द, पात्र-स्नेही, परार्थकृत स्व-पर धर्मांचे पालक संसारसागराचे तारक आचार्य परमेष्ठी आहेत.

मुनि-आर्यिका, श्रावक-श्राविका अशा चतुर्विध संघाने 'संघाधिपती' निवडून श्रेष्ठ व ज्येष्ठ साधुना सर्व साक्षीने 'आचार्यपदा' ने विभूषित केलेले असते. चारी घटक श्रध्दा-भक्तीपूर्वक, आचार्यांच्या चरणी आपले दोष प्रांजलपणे निवेदन करून प्रायश्चित-दंडादिकांची वारंवार याचना करतात. गत दोषांची आलोचना करून प्रायश्चित स्वीकरून दोषपरिमार्जन करतात व व्रतादि प्रतिज्ञा घेऊन आत्मा रत्नत्रयाने नित्य उजळून टाकतात. आचार्यांच्या बाह्य क्रिया नारळाच्या कवचाप्रमाणे बाहेरून कर्तव्यकठोरपणाने कटु व कठोर वाटल्यातरी अंतरंगातील भावना आतील मधूर गर व पाण्याप्रमाणे मुलायम व परिणामी हिताच्या असतात. अशी संघस्थ प्रत्येक व्यक्तीची दृढ श्रध्दा असते. म्हणून आचार्य परमेष्ठी वंदनीय आहेत.

## णमोकार मंत्रातील ४ थे पद -

' णमो उवज्झायाणं ' उपाध्याय परमेष्ठींना नमस्कार असो.

मिथ्यावादिमदोग्रध्वान्तप्रध्वंसि वचनसंदर्भान् । उपदेशकान् प्रपद्ये मम दुरितारिप्रणाशाय ॥

अर्थात - उपाध्याय परमेष्ठीची मुख्य दोन लक्षणे आहेत. स्वतंः निरलसपणे प्रयोजनभूत, जिनप्रणीत ग्रंथाचे पारायण, अध्ययन, मनन, चिंतन करून इतरांना त्याच पध्दतीने करविणे.

त्यांच्या उपदेशाच्या किरणांनी खोटया व बनावटी मान्यतांचा म्हणजेच मिथ्यांधकाराचा नाश होतो. निरहंकारी स्वतःची प्रवृती ठेऊन आचार्याप्रमाणे परोपदेशादि करतात. दोघामध्ये फरक एवढाच की आचार्य अधिकृतपणे आज्ञा, आदेश सांगतील. परंतू उपाध्यायजी केवळ कर्तव्य-कर्म म्हणून प्रतिपालन होवो वा न होवो- सदाचरणाचा उपदेश करीत राहतील.

## उपाध्यायाचे यथेचित लक्षण -

घोर संसार भीमाडवी काणणे । तिक्खवियरालणहपाष पंचाणणे ।

पट्ठमग्गाण जीवाण पहदेसिया । वंदिमो ते उवज्झाय अम्हे सया ॥

संसाराचे स्वरूप भयंकर दाट अरण्याप्रमाणे असून या भयंकर अरण्यात पंचपापांच्या तीक्ष्ण बाणांचा वर्षाव सतत हाऊन सुखाचा मार्ग नष्ट झाला आहे. मार्गभ्रष्ट जीवास सन्मार्गाचा दीप हाती देण्याचे कार्य उपाध्यायजी करतात.

वास्तविक यांची प्रवृत्ति पण आचार्याप्रमाणे रत्नत्रयाची आराधना करून स्वतःचा आत्मा उज्वल, उन्नत कसा राहील यासाठी सतत जागृत असते. ११ अंग व १४ पूर्व = अशा २५ मूलगुणांचे धारी उपाध्यायजी आहेत. ज्ञान-ध्यान-तपामध्ये लीन राहून विषय, आशा व संसारभोग, यांपासून विरक्त राहून अंतरंग व बहिरंग- बारा प्रकारच्या तपोभूमीतच जणू रहातात अर्थात तपश्चर्या करीत, स्वर-पर ज्ञान साधना करण्यांत तत्पर असतात.

## णमोर मंत्रातील ५ वे पद -

णमो लोए सव्वसाहूणं । लोकांतील सर्व साधूंना नमस्कार असो.

सम्यग् दर्शनदीप प्रकाशकामेयबोधसंभूताः । भूरिचरित्रपताकास्ते साधुगुणास्तु मां पान्तु ॥

अर्थात 'साधू' परमेष्ठी सम्यक् श्रध्देच्या रूपाने मानस मंदिरात प्रकाश भरून टाकतात, ज्ञानाने भारावून जातात, चारित्र्याची ध्वजा फडकवितात असे साधु माझे रक्षण करोत.

### असे साधु कसे व कुठे असतात ?

गिरिकंदर दुर्गेषु ये वसन्ति दिगंबरा । पाणिपात्रपुटाहाराः ते यांतिपरमां पदम् ॥

पर्वताच्या निसर्गरचित गुंफा, तट, किल्ला, इ. मध्ये निरूपद्रवीपणाने दिगंबर - अपरिग्रहीवृतीने राहतात, पाणी-पात्र अर्थात स्वतःच्या ओंजळीने दिवसातून एकदाच निर्दोष, शुध्द, ४६ दोष टाळून आहार व जल उभे राहून घेतात : तेच साधु उत्कृष्ट अर्थात अर्हंत-सिध्द पदाला पोहोचतात.

त्या साधूंची आणखी विशेषता ही की - २८ मूळ गुणांचे पालन खडतर तपश्चर्या करीत करतात. (अहिंसादि ५ महाव्रते ईर्यादि ५ समिति, पांच इंद्रियविजय, समतादि ६ आवश्यक भक्तिक्रिया व भूमिशयनादि ७ शेष गुण ).

साधु परमेष्ठी रत्नत्रयाच्या विकासाचा प्रारंभ करतात. अनंतज्ञानादि चतुष्टय स्वरूपी आत्म्याची मन-वचन-कायेने निरंतर साधना करतात. म्हणून ते 'साधु' होत. १८ हजार प्रकारे निरतिचार, निर्दोषपणे शील-व्रत पाळून आपला महान रत्नत्रयसंपन्न आत्मा त्रिगुप्तीच्या किल्ल्यात सुरक्षित ठेवतात. उग्र व घोर तपश्चर्या करून काम-विकार, रागव्देषमोहरूपी शत्रूना 'क्षीण' करून टाकतात. शुक्ल लेश्यांचे शुध्दातिशुध्द परिणाम करत ध्यानाग्नीने आत्म्याचे उज्वल रत्नत्रय उजळून घेतात, दोषकालिमा धुऊन स्वच्छ होतात ; असे साधु परमेष्ठी मोक्षमार्ग प्रदर्शक असतात.

## क्रम-विशेष

आचार्य-उपाध्याय-साधु हा णमोकार मंत्रातील उत्तरार्ध साधकाच्या भूमिकेवरील महत्वपूर्ण विकास-क्रमाचा भाग आहे. आत्मिक व अध्यात्मिक उत्कर्षाचे दृष्टीने या परमेष्ठींना अंशतः 'देवत्व' प्राप्त झालेले आहे. मुक्तिपथाचे ते पाईक आहेत. वीतरागता हा सामान्यंश सर्वांचा आत्मा आहे. बाहेरच्या कर्तव्यादिक आचारतत्वामुळे वेगळेपणा करुन श्रेष्ठ-कनिष्टपद ठरविलेले असले तरी तिघांच्याही २८ मूळगुण पालनात तसूभरही अंतर पडत नाही. वीतराग-विज्ञानतेचे तिघेजण एकनिष्ट उपासक आहेत.

वास्तविक मंत्रातील पूर्वार्धाप्रमाणे उत्तरार्धातही परोपकारीपणाच्या लौकिक कार्यामुळे आचार्याना श्रेष्ठपणा लाभला आहे. वास्तविक साक्षात् मोक्षमार्गावर आरूढ होण्यास 'साधु' पद उत्तम व श्रेष्ठ आहे. गुणस्थान आरोहण- साणुपदातच होते. आचार्य-उपाध्याय ही पदे उपाधिस्वरूप असल्याने अंतिम सल्लेखना महाव्रताचे धारण करतांना उपादेय रहात नाही. त्या पदाचा त्याग करून साधु-पदात स्थिर होऊनच आत्म-

कल्याण साधते. या दृष्टीने अंतिम पद असूनही साधुपद प्रथम भजनीय आहे. म्हणजेच मुमुक्षु, सुखार्थी जीवाने प्रथम वैराग्य भावनेने उपेक्षा संयम धारण करून साधु व्हावे. त्यानंतर उत्तरोत्तर उलट दिशेने विकास करीत आपल्या सहज शुध्द चितन्तन ज्ञायक स्वभावाने 'सिध्द' दशा प्रगट करावी.

याप्रमाणे आचार्य-उपाध्याय-साधु मुक्तिमार्गाचे, रत्नत्रयाचे साधक असून अर्हत्-सिध्द साध्य आहेत. मंत्राच्या पूर्वार्धत देवत्वाचा पूर्णांश प्रगट आहे तर उत्तरार्धात एकदेशांश प्रगट आहे. निश्चितपणे देवत्वाप्रत जाणा-या सर्वाना या महामंत्रातून नमस्कार केलेला आहे. कोणत्याही जीवाचा असा विकास हाउ शकतो. ही महत्वाची गोष्ट या मंत्राने दिलेली अलौकिक सुखाची गुरूकिल्ल्ीच आहे.

एषः पंच नमस्कारः सर्वपापप्रणाशकः । मंगलानांच सर्वेषां प्रथमं भवति मंगलम् ॥

अशी या महामंत्राची ख्याती प्राचीनकालापासून आहे. म्हणून महामंत्राची अंचली मंत्रापूढे अशी गातात- सर्व पापांचे क्षालन करण्याची किमया येथे आहे.

'अरिहंत मंगलम् सिध्द मंगलम् साहू मंगलम् केवली पण्णतो धम्मो मंगलम् '

अरिहंत लोगुत्तम्मा, सिध्द लोगुत्तमा, साहूलागुत्तमा, केवलीपण्णत्तो धम्मो लोगुतम्म -

अरिहंतसरणं पवज्जामि, सिध्दसरणं पवज्जामि

साहूसरणं पवज्जामि, केवलि पण्णतं धम्मंशरणं पवज्जामि

अर्थात् - सर्व पापरूप अमंगलाचे गालन करणारा, मं-गालयति इति, मं-गलम् अशी व सर्व सुखप्रदमंगलाति इति, मंगलम् अशी व्दयर्थी सार्थ व्युत्पती करणारा हा मंगल मंत्र आहे. जगातील सर्वोतम-निधी हा महामंत्र म्हणजेच यातील पंचमपरमेष्ठी आहेत. साधू या शब्दात आचार्य-उपाध्याय दोघांचा समावेश आहे. मंगल व सर्वोत्तम अशा पंचपरमेष्ठी शिवाय, जगात शरण जाण्यायोग्य, कोण ? संसार भय ग्रस्त शरणार्थी जीवास असणार ?

## मंत्र-उत्पत्ति व इतिहास-

ऋषीचे कूळ व मंत्राचे मूळ पाहू नये. मंत्र स्वयं शुध्द, स्वयंप्रकाशी असताना इतिहासाच्या कालबंधनातून त्याची खरी उत्पत्ति व सत्य मूल्यांकन होणार नाही. तरी पण अल्पबुध्दीला इतर दाखल्याची, अन्य शिफारशीच्या पांगुळगाड्याची प्रमाणे द्यावी लागतात. या मंत्राच्या इतिहासाबद्दल अशी प्रसिध्दी आहे.-

'अनादिमूलमंत्रोऽयं सर्वविघ्नप्रणाशकः' । मंगलेषु च सर्वेषु प्रथमं मंगलं मतः ॥

हा णमोकार मंत्र अनादि, स्वतःसिध्द, स्वयंप्रकाशी सूर्याप्रमाणे आहे. प्रत्येक कल्पकाली तीर्थंकरांनी याचा अर्थ व याचा अर्थ व त्यांच्या गणधरांनी शब्द-सुमनांनी गुंफलेला आहे. कारण नमस्कारणीय पंचपरमेष्ठीचे अर्थात् प्रत्येक जीवमात्राचे, परमात्म्याचे स्वरुप अनादि-अनंत आहे. म्हणून हा मंत्रसुध्दा अनादि आहे.

कालदोषामुळे मंत्रपरंपरा लुप्त होत असता गुरुमुखाने या मंत्राचे पुनरुज्जीवन व पुनरोध्दार झालेला आहे. त्या दृष्टीने हा मंत्र सादि सान्त पण आहे.

आचार्य पुष्पदंतानी धवल ग्रंथाच्या प्रारंभी 'णमो अरिहंताणं' मंगलसूत्र लिहिले आहे. या ग्रंथाचे टीकाकार आचार्य वीरसेनानी याबद्दल सुंदर स्पष्टीकरण करुन विषयावर स्वच्छ प्रकाश टाकलेला आहे.

परंपरागत अर्थानुसार शब्दांकित रचना केली असता ते निबध्द मंगल व सादि मंगल असते. म्हणून हा मंत्र अनिबध्द व निबुध्द, अनादि व सादि असा द्रव्य-पर्यायार्थिक दृष्टींनी समजून घेणे आवश्यक आहे. स्व-रचित शब्दांकन म्हणजे 'निबुध्द' व परकृत म्हणजे अनिबध्द असाहि अर्थ आहे.

'भगवतीसूत्र' या प्राचीन श्वेतांबर ग्रंथात या मंत्रातील 'णमो लोएसाहूणं' ऐवजी 'णमो बंभीए लिपिए' असा पाठ आहे. इ. सनापूर्वी सम्राट खारवेल कालीन उडीसाच्या हाथी गुंफेतील शिलालेखातसुध्दा 'णमो अरिहंताणं णमो सिध्दांणं' असे पाठ आढळतात.

## णमोकार मंत्र-विधी व उद्देश्य

शब्दोच्चारांच्या कलेवरावर ‘विधी’ चे पुष्कळदा आडंबर माजून मूळ उद्देश दूर राहतो व विपर्यस्त प्रकार पहायला मिळतो. तरी पण फलप्राप्तीची जेव्हां अपेक्षा असते तेव्हा ‘विधी’ नियोजन, आयोजन पध्दतीचे अवलंबन घेणे अनिवार्य होऊन जाते. वास्तविक रीतीने णमोकार मंत्राचा मंगलध्वनी केव्हा व कसा काढावा याबद्दल बंधन नाही.

अपवित्रः पवित्रो वा सुस्थितो दुस्थितोऽपि वा । ध्यायन् पंचनमस्कारं सर्वपापैः प्रमुच्यते ॥

सर्व पापांना क्षणात भस्म करणारा- हा अपराजित मंत्र आहे. तरी पण द्रव्य-क्षेत्र-काल भाव विधुध्दीने केलेला मंत्र-जप विशेष समृध्दीप्रद फल देतो.

प्रतिदिनी १०८ वेळा कमल-हस्तांगुली वा माला स्फटिक, चंदन, मणि, मोती, पोवळे इ. धातूंची वा पुष्प, लवंग, तंडुल वा हाताच्या अंगुलीवर किंवा सुताच्या धाग्यांच्या मण्यांनी यथाशक्ती जाप्य करण्याची प्रथा आहे. ‘भावशून्या क्रिया निष्फली भवती’ या न्यायाने जेव्हा मंत्राचे फल लाभत नाही तेव्हां भावामधील उणीव-कमतरता समजून भावना-परिणामांची विशुध्दी-उज्वलता अधिकाधिक होत राहील असा पुरुषार्थ केला पाहिजे.

१०८ या संख्येतील रहस्य असे की जीव-मात्र प्रतिदिन कमीतकमी १०८ प्रकारांनी स्वतःला दोष लावून घेतो. ते असे- मनुष्य मन-वचन-काय-कृत-आरंभ-संरंभ व समारंभपूर्वक क्रिया उद्योग करतो. म्हणून प्रत्येकी ३ प्रमाणे ३ X ३=९ वरील ९ प्रकार कृत-कारित-अनुमत असे घडतात. अर्थात प्रत्येकी- ९X ३=२७.

क्रोध-मान-माया-लोभ-आत्मघातक अशा ४ कषायांच्या बैठकीवरुन वरील २७ प्रकारच्या क्रिया संभवतात. अर्थात प्रत्येक कषायाव्दारे २७ प्रकार लक्षात घेता ४X२७=१०८. १०८ मणी वा पुष्पादिकांचे इंगित याप्रमाणे समजून महामंत्राचे स्मरण,चिंतन, उच्चार सर्व काही भाव-पूर्ण न झाले तर कबिराने म्हटल्याप्रमाणे ते ‘स्मरण’ नाही, प्रायः असे आढळते.

माला तो करमें फिरे, जीभ फिरे मुखमाहि । मनुवा तो बाजारमें, यह तो सुमिरण नाहि ॥

मंत्र-जप करतांना एकाग्रता, तल्लीनता, तन्मयता इतकी झाली पाहिजे की त्यावेळी उपास्य-उपासक, साध्य-साधक, ध्येय-ध्यायक असा भेद शिल्लक राहता कामा नये. पंचपरमेष्ठीच्या परमज्योतीने स्वतःच्या परमात्म्याचे निरांजन पेट घेऊन तेवत राहिले पाहिजे.

या णमोकार महामंत्राचा बीजध्वनि सर्व लौकिक वा अलौकिक मंत्रशास्त्रांचा भरीव पाया आहे. त्या आधारशिलेवर सारे मंत्र-तंत्र शास्त्र जाळ्यासारखे पसरले आहे. णमोकार महामंत्राच्या सागराचे जल प्रत्येकाने आपल्या कुंभात संचित करुन ‘नवमंत्र रचना’ केली आहे.

आत्म-वैभव साधक व चमत्कारीक मंत्राचा उल्लेख आचार्य नेमिचंद्रानी द्रव्यसंग्रह ग्रंथाच्या ४९ व्या गाथेत असा केला आहे-

पणतीस सोल छप्पन चऊदुगमेगं च जवह झाएह । परमेट्ठि वाचायाणं अण्णं च गुरुवएसेण ॥

अर्थात- पंचपरमेष्ठीवाचक महामंत्र ३५, १६, ६, ५, ४, २, १ अशा अक्षराने सिध्द होतो. म्हणून त्यांचे ध्यान जप करावा असा उपदेश वा आज्ञा आहे. पस्तीस अक्षरी णमोकार मंत्र आहे.

१६ अक्षरी मंत्र ‘अर्हत्सिध्दाचार्योपाध्यायसर्वसाधूभ्यो नमः ।’ ‘अरिहंतसिध्दआइरियोवज्झाय-साहूणं ’

६ अक्षरी मंत्र ‘अरिहंतसिध्द ’‘अरिहंत सिसा’ ‘ओम नमः सिध्देभ्यः’

‘नमोऽर्हत्सिध्देभ्यः’ असे ३ आहेत.

पंचाक्षरी ‘अ सि आ उ सा’ ‘ णमो सिध्दाणं’

चार अक्षरी - ‘अरिहन्त’ ‘अ सि सा हू ’

दोन अक्षरी - ‘ओम ऱ्हीं’ ‘सिध्द ’ ‘असि ’

एक अक्षरी - ओम, ओं, ‘अ’ ‘सि’

अशा प्रकारची विविध मंत्रांची रुपे सर्व ऐहिक व पारमार्थिक सिध्दीप्रद आहेत.

णमोकार मंत्राचे व्रत-विधान पण आहे. ‘णमोकार पंच त्रिंशत् भावना’ व्रताचे पालनाने ऐश्वर्यलाभ होतो. १ वर्ष ६ महिनेपर्यंत पदातील अक्षरानुसार आषाढ-श्रावण-भाद्रपद-अश्विन महिन्यातील सप्तमीचे ७ उपवासानंतर कार्तीक महिन्यापासून पौष महिन्यातील पंचमीचे ५ उपवास, पौष चतुर्दशीपासून चैत्र चतुर्दशीचे

७ उपवास, श्रावणातील नवमी पासून मार्गशीर्ष नवमी पर्यत ९ उपोषण असे एकूण ३५ उपोषण करुन मंत्रजप पूजा-अभिषेक करुन पुण्योपार्जनामणध्ये काल घालवावा.

किंवा ७० दिवस सतत एकासन करुन व्रत विधान करण्यासाठी उल्लेख आहेत. श्रावकांच्या नैमित्तिक पर्व तिथीच्या व्रतांपैकी २५/३० व्रतांचे विधानात याच महान मंत्राचे अनुष्ठान व जाप्य सांगितले आहे.

केवळ मंत्र-जपानेसुध्दा उपोषणाचे फल लाभते. मग विधिपूर्वक व्रतविधान संपन्न होत असता विशेष पुण्यसंचय, इष्ट फलप्राप्ति व अनष्टि परिहार होईल यात आश्चर्य नाही.

मंत्र-माहात्म्य-

मंत्रोच्चारांच्या शब्दनिनादाने विद्युत-शक्ति निर्माण होऊन श्वासोच्छावासाच्या वायुलहरीमुळे विष शस्त्रादि प्रहारांचे दुःख, भूत-पिशाचजन्य बाधा, जल-अग्निंचे भय, रोग-पीडा इ. सर्व अरिष्ट-अशुभांचे निर्दलन होऊन जाते. आणि सर्व शुभ मंगलमय प्रसन्न वातवलय सभोवती खेळून चित्त प्रसन्न होऊन जाते, सूर्योदयासरशी कमळे सहज फुलून प्रफुल्लित होऊन जातात, तशी मंत्रोच्चराने अंतःकरणाची सृष्टी फुलून प्रफुल्लित होऊन जाते. मंत्रध्वनीची विद्युत शक्ती विज्ञानाने सिध्द होत असून वैज्ञानिक दृष्टीने 'पंचणमोकारमंत्र' शुध्द बीजाक्षरांचा, शुध्द वर्णमय आहे. मंत्राच्या निमित्ताने ऐहिक लाभाचीच केवळ अपेक्षा करु नये. कारण हा महामंत्र आत्म्याचे सहज-स्वाभविक पण अलौकिक- दिव्य चिरंतन गुण भांडार उघडून देण्याची गुरुकिल्ली आहे. अशा या बहुगुणी, बहुमूल्ययुक्त मंत्रापासून क्षूद्र लाभाची आशा करणे मूर्खपणाचे आहे.

'त्रिलोकी-मूल्य रत्नेन दुर्लभः किं तुषोत्करः ?' या महामंत्रामध्ये त्रैलोक्यातील सारे मौल्यवान पदार्थ विकत घेण्याचे सामर्थ्य असता- भूशाचा ढीग खरीदणे काय कठीण आहे? ऐहिक, पंचेंद्रियजन्य विषय-सुख अगदीच भुशाप्रमाणे किरकोळ बाब आहे. धान्य राशी मिळणा-या शेतात कडबा वेगळा पेरावा लागत नाही. आत्म्याचे अचिंत्य, अनुपम, रत्नत्रयादिक वैभव देणा-या या महामंत्रापासून अन्य क्षणिक सुखाची इच्छा करणे म्हणजे 'कोल्हा काकडीला राजी' झाल्याप्रमाणे होय. बहुमूल्य वस्तु देऊन तुच्छ पदार्थ मोबदल्यात घेण्याचा मूर्खपणा कोणता सूज्ञ मनुष्य करील ? या मंत्राची महती एका कुत्र्याच्या जीवाला सुध्दा कळाली अन् त्याने आपला उध्दार केला.

मरणक्षणलब्धेन येन श्वा देवताऽजनि । पंचमंत्रपदं जाप्यमिदं केन न धीमता ।।

वादीभसिंहसूरींनी प्रत्युत्तराची अपेक्षा न करता प्रथम पंक्तीतील सूचक उत्तरांनी प्रश्न टाकलेला आहे.

या महामंत्रामध्ये संपूर्ण शास्त्रचे सार असे साठलेले आहे. वृक्षाच्या सा-या विस्ताराचे सार त्याच्या फलामध्ये संचित असून फलनिष्पत्तीवरच वृक्षाची महत्ता असते तव्दत् मंत्राची महत्ता त्यामुळे मिळणा-या ऐहिक पारमार्थिक फलावरुन सिध्द झालेली आहे.

फुलांचा सारा सुगंध अत्तराच्या थेंबात केंद्रीत व्हावा तद्वत् अथांग तत्वज्ञानाचा सारा समुद्र या महामंत्रात सामावलेला आहे. अग्नीच्या एका ठिणगीमध्ये आकाशाला भिडून ज्वाला उफाळून सा-या भोवतालच्या पदार्थांना भस्म करण्याचे सामर्थ्य असते तव्दत् जन्मजन्मान्तरामधील पापराशींना भस्म करुन १०० नंबरी सोन्याप्रमाणे शुध्द, तेजस्वी, बहुमोल जीवन करण्याचे सामर्थ्य या मंत्रात आहे.

कितीही काळापासून दाट अंधाराच्या खोलीत प्रकाशासाठी लहानशी ज्योत पुरेशी आहे तसे अनादि मोहतमाने व्याप्त बहिरात्म्याला पंचपरमेष्ठीची स्मरण ज्योत उजळून अंतरात्म्याची प्रचिती, श्रध्दा निर्माण करुन परमात्म-मंदिरात जाण्यासाठी सहकार्य देते.

शास्त्रीय पारिभाषिक शब्दात - या मंत्राच्या स्मरणाने आत्म सन्मानाची भावना उचंबळून येते, आत्याचे प्रशम- संवेग, अनुकंपा व आस्तिक्य गुण उजळून जातात. सम्यकत्वाची दिव्य ज्योत पेटून स्व-परभेद विज्ञानाची दृष्टी अलौकिक सृष्टी दाखवू लागते आणि म्हणूनच मंत्राचे अंतिम फल श्रेयोमार्गस्य संसिध्दिः प्रसादात् परमेष्ठिनः । असे उपचाराने म्हणता येईल. परमार्थाने - अभेद उपासना म्हणजे पंचपरमेष्ठींच्या मूल गुणांची ओळख होत असताना स्वतःच्या तत्सम आत्म्याची अनुभूती, प्रचिती येणे हीच होय आणि चरमोत्कर्षाचा प्रदर्शक, दीपस्तंभाप्रमाणे मार्गदर्शक हा मंगल मंत्र सार्थ आहे.

केवळ मंत्र-जपानेसुध्दा उपोषणाचे फल लाभते. मग विधीपूर्वक व्रतविधान संपन्न होत असता विशेष पुण्यसंचय, इष्ट फलप्राप्ति व अनिष्ट परिहार होईल यात आश्चर्य नाही.

पूज्यपाद आचार्यांनी भक्तिपाठातून पंचपरमेष्ठीची अनन्य प्रकारे भक्ती केली आहे. पंचपरमेष्ठींनाच पंचगुरु म्हणून त्यांची महती गाईली आहे. त्याच आराध्य देवता आहेत.

आकृष्टिं सुरसंपदां विदधते मुक्तिश्रियं वश्यताम् उच्चाटं विपदां चतुर्गतिभुवां विद्वेषमात्मैनसाम् ।
स्तम्भं दुर्गमनं प्रति प्रयततो मोहस्य सम्मोहनम्, पायात्पंचनमस्क्रियाक्षरमयी साराधना-देवता ॥

या आराधना योग्य देवता माझे संरक्षण करोत. त्या अमर वा अक्षर-युक्त आहेत. मोहासारख्या दुर्गतीत लोटणा-या भूल पाडणा-या शत्रूला त्या बांधून ठेवतात. सारे पाप-रागव्देष नष्ट करतात. आपत्तीचे निर्दलन करुन मुक्ती लक्ष्मीला स्वाधीन करवितात आणि दैवीसंपत्तीला आकर्षून टाकतात. म्हणून अशा त्याच सर्वोत्तम,सर्वमंगल देवता प्रत्येकाला शरण आहेत.

या पंचदेवतांची पतपेढी म्हणजे जणू 'णमोकार मंत्र' आहे. फरक एवढाच की या पतपेढीमध्ये अनंत अमर्याद गुणरत्नांचे भांडवल प्रत्येंक जीवाचे स्वतःच्या मालकीचे आहे. श्रध्देने, विश्वासाने त्यास स्वीकृती दिली असता- श्रध्देच्या प्रमाणात त्यापासून प्रत्येकाला नफा-फायदा प्रत्यक्ष मिळत राहतो.

या मंत्राचे महात्म्य व चमत्कार असा की, यास विशिष्ठ काही तंत्र नाही, यंत्र नाही. तंत्र-यंत्र व शब्दोच्चार मंत्राचे जड कलेवर आहेत. मंत्राचा प्राणसाधकाचा भाव आहे. आणि म्हणूनच हा मंत्र उलटसुलट कोणत्याही अक्षरपदांनी, भावपूर्ण जपला असताना तो फलदायी होतो. प्रत्येक जीवमात्रास उध्दारासाठी, सुखप्राप्तीसाठी या मंत्रात महान आदर्शाना साक्षी ठेवून प्रयत्न, पुरुषार्थ करण्यास विनाशर्त आवाहन दिलेले आहे !

हा णमोकार मंत्र 'ओंमकार' दिव्यध्वनी पासून निघाला म्हणून अनादिनिधन महामंत्र आहे.

अरिंहंता असरीरा आइरिया तह उजज्झया मुणिणो । पढमक्खरणिपण्णो ओमकारो पंच परमेष्ठी ॥

**भावार्थ-** अरिहंत, अशरीरी ( सिध्द), आचार्य, उपाध्याय, मुनि ( साधु) या पंचपरमेष्ठीवाचक पांच शब्दांतील आद्याक्षरांपासून 'ॐ' बनला. सर्वसामान्य व्याकरणाधारे 'अ+ अ + आ +उ + म्' = ओम् असेच रुप सिध्द होते, पण जैन शास्त्रात तर-

'ॐकारं बिंदुसंयुक्तं नित्यं ध्यायंती योगिनः'

असे म्हटले जाते आणि ते फक्त जैन व्याकरण शास्त्राधारेच सिध्द होऊ शकते, कारण 'म्' चा अनुस्वार सर्वच व्याकरणकारांनी मानला, पण मध्यंतरी 'म्' आल्यासच. पदान्त्य 'म्' चा अनुस्वार इतर व्याकरणकरांनी मानला नाही.

"मोऽनुस्वारः' । पदान्ते वा" । पदान्त्य 'म्' चा विकल्पाने अनुस्वार मानणारी ही दोन सूत्रे फक्त कातन्त्र या जैन व्याकरणातच आढळतात. आणि ॐकाराचे बिन्दुयुक्त रुप इतिहासपूर्व कालापासून आढळते. वरील गाथेत उल्लेखिलेले ॐकाराचे रुप पंचपरमेष्ठीमय असून ते जैन तत्वज्ञानाप्रमाणेच व्याकरणसिध्द आहे यात कसलाही संशय अथवा वाद राहात नाही.

# जैन-ध्वज

जैन शासनात जैन ध्वजाचे फार महत्व आहे. त्याचे वर्णन खालीलप्रमाणे केले आहे.

## ध्वजारोहण-विधी

प्रतिष्ठापाठामध्ये ध्वजारोहण विधीचे निरुपण करतानाच ध्वजाच्या महात्म्याचे वर्णन पुढीलप्रमाणे केले आहे.

कलशात्उत्थिते हस्तं ध्वजे नीरोगता भवेत् । व्दिहस्तमुत्थिते तत्स्मात्पुत्रर्ध्दिर्जायते परा ॥

त्रिहस्तं तस्य सम्पत्तिर्नृपवृध्दिश्चतु: करम् । पञ्चहस्तं सुभिक्षं स्याद् राष्ट्रवृध्दिश्च जायते ॥

अम्बरेण कृतो यस्याद ध्वजः सम्यक् समन्ततः । सोतिलक्ष्मीप्रदो राज्ये यशःकीर्तिप्रतापदः ॥

भूपालबालगोपालललनानां समृध्दिकृत् । राज्ञां सुखार्थदायी च धान्यैश्वर्यजयावहः ॥

आचार्यकल्प आशाधर प्रतिष्ठापाठ (अ.५ श्लोक ७४-७५)

मंदिराच्या शिखरकलशावर एक हात उंच असलेला ध्वज आरोग्य प्रदान करतो. दोन हात उंच सुपुत्रादी संपत्ती, तीन हात उंच धान्य-संपत्ती, चार हात उंच राजाला वृध्दि, पाच हात उंच सुभिक्ष व राज्यवृध्दि प्रदान करणारा असतो. वस्त्रांनी बनविलेला तसेच चारी बाजूला फडफडणारा ध्वज राज्यात यश, किर्ती व प्रताप विकीर्ण करणारा असतो. हा ध्वज शेंतकरी , बालक, गोरक्षक, योग्य स्त्री इत्यादींचा समृध्दी करणारा व शासनासाठी धान्य, ऐश्वर्य सुख इत्यादी प्रदान करणारा आहे. पुढील मंत्र म्हणून ध्वजारोहण केले जाते.

ॐ णमो अरहंताणं स्वस्तिभद्रं भवतु सर्वलोकस्य शांतिर्भवतु स्वाहा ।

ध्वजरोहण करणारा म्हणतो-

श्रीमज्जिनस्य जगदीश्वरता ध्वजस्य । मीनध्वजादिरिपुजालजयोध्वजस्य ॥

तन्न्यासदर्शनजनागमनं ध्वजस्य । चारोपणं सुविविधवद्‌विदधे ध्वजस्य ॥

जो ध्वज वृषभदेव महावीर इत्यादी २४ तीर्थंकराची जगदीश्वरता, कामदेवादि रिपुसमूहावरील विजय सूचित करतो जिनबिम्बांच्या दर्शनार्थिना आवाहन इत्यादींचे प्रतीक आहे. अशा या ध्वजाचे मी विधिवत् आरोहण करीत आहे.

इति ध्वजारोहविधिः सभेरीसंताडनं यो विदधाति भव्यः ।

स मोक्षलक्ष्मीनमनोत्पलानां नक्षत्रनेमित्वमुपैति नूनम् ॥

वाद्यवाजंत्रीच्या निनादात जो भव्य पुरुष ध्वजारोहण विधि संपन्न करतो किंवा करवून घेतो तो मोक्षलक्ष्मीच्या नेत्रातील प्रिय-भाव अवश्य प्राप्त होते.

जैन शासनात ध्वजाची प्रथा प्राचीन काळापासून चालत आलेली आहे. जैन शासनाच्या ध्वजाखाली सर्व सहधर्मी बंधुसमान आहेत. त्यात कोणी लहान नाही किंवा रहातच नाही. श्रमणश्रमणा, श्रावकश्राविका चतु:संघ एकच जैन शासनाच्या छत्राखाली स्थित आहे.

शिवमस्तु सर्वजगतां परहितनिरता भवन्तु भूतगणाः । दोषाः प्रयान्तु नाशं तिष्ठतु जिनशासनं सुचिरम् ॥

आचार्य नेमिचंद्र प्रतिष्ठातिलक (२१७).

सर्व लोकांचे कल्याण होवो. जीवमात्र परहित करण्यात तत्पर राहो. दोषांचा नाश होवो. जैन शासन चिरकाल पृथ्वीवर प्रवर्तित राहो हाच ध्वजाचा संदेश.

## ध्वजाच्या बाबतीत निष्ठा व प्रतिज्ञा

"मी जैन शासन व सार्वभौम महामंत्र णमोकार , तसेच अनेकांतवाद व अहिंसा इत्यादींच्या बाबतीत मन, वचन व कायेने निष्ठा ठेवण्याची प्रतिज्ञा करतो. "

## प्रतीक चिन्ह स्वस्तिक

स्वस्तिक एक रहस्यमय प्रतीक आहे. त्याची निर्मिती भारतीय संस्कृतीच्या पूर्वीच झालेली आहे. ऋग्वेद सर्वात प्राचीन आहे. त्यात जेथे तेथे स्वस्तिकाचे विवरण आहे. विद्वानांचे मत आहे की, स्वस्तिकाची उत्पत्ति ऋग्वेदापेक्षाही प्राचीन आहे. स्वस्तिक शब्द 'सु-अस्' या धातुपासून बनला आहे. 'सु' म्हणजे सुंदर, मंगल व 'अस्' म्हणजे अर्थातच अस्तित्व वा उपस्थिती. तीन लोक, तीन काल व प्रत्येक वस्तूत जे विद्यमान आहे तेच सुंदर-मंगल उपस्थितीचे स्वरुप होय. हीच भावना स्वस्तिकाची आहे.

चतुर्गति नामांकन व उन्नति-दर्शक भावपूर्ण प्रतीक.

जैन शासन सर्वस्वी कल्याणमय आहे. त्याचे प्रतिक स्वस्तिकही तदनुरुपच आहे. स्वस्तिक चिन्ह आपले महत्वपूर्ण स्थान ठेवते. स्वस्तिकाचा अर्थ आहे 'स्वस्ति करोतीति स्वस्तिक:' अर्थातच जे स्वस्तिकल्याण करते ते प्रत्येक शुभ कार्यात स्वस्तिकाच्या अस्तित्वाचे महत्व आहे. स्वस्तिक जीवनातील मुक्तीपर्यंतच्या सर्व अवस्थांकडे प्राण्याचे लक्ष आकर्षित करते. देव, मनुष्य, तिर्यंच व नरक या चार गति आहेत. त्या स्वस्तिकाच्या चार कोनानी दाखविल्या जातात. तीन बिंदू मोक्षमार्गाच्या मार्गासाठी सम्यग्दर्शन, सम्यग्ज्ञान व सम्यक् चारित्र दर्शवितात व अर्धचंद्र सिध्दशिलेचे प्रतीक आहे. याप्रमाणे जैन शासनाचे फलित रुप स्वस्तिकाच्या रुपाने मूर्त स्वरुपात पुढे आणलेले आहे व त्यालाच स्वस्तिक नाव दिलेले आहे. स्वस्तिक सर्वथा मंगलकारी आहे. स्वस्तिकाच्या बाबतीत प्रसिध्द आहे की-

नर-सुर-तिर्यङ्नारकयोनिषु परिभ्रमति जीवलोकोऽयम् ।

कुशला स्वस्तिक रचनेतीव निदर्शयति धीराणाम ।।

हा जीव या लोकात मनुष्य, देव, तिर्यद्ञ्च व नरक योनी या चतुर्गतिमध्ये परिभ्रमण करत असतो. हेच स्वस्तिकाची रचना कुशल प्रकाराने व्यक्त करते.

## नित्य शुभ मंगल

स्वस्तिक चिन्ह जैन धर्माचे 'आदि चिन्ह' आहे व जैन समाज नेहमी शुभ कार्यात याचा उपयोग करतो. हे चिन्ह जैन धर्माच्या ग्रंथ व मंदिरामध्ये मोठ्या प्रमाणात पहावयास मिळते, जैनांच्या अक्षत-पूजेमध्ये आजही हे चिन्ह तयार केले जाते किंवा काढण्यात येते.

वेदिकाग्रे ततः कुर्यात्स्वस्तिकं स्थंडिलान्वितम् । पूर्वापरदिशो रम्यं तंडुल पुञ्जकव्दयम् ।।

सोमसेन (११।१६).

वेदिच्या अग्रभागी चौकोनी चबुत-याचा आकार बनवून त्यावर स्वस्तिक चिन्ह काढावे. पूर्वेला एक व पश्चिमेला एक असे दोन तांदळाचे ढीग ठेवावेत. स्वस्तिकात केलेले जीव-गतीचे निरुपण स्वस्तिक चिन्हाव्दारे

जीवाच्या चार विभागांचे किंवा गतीचे निरुपण केले आहे. खालील चिन्हावरुन ही गोष्ट स्पष्टपणे लक्षात येईल.

स्वस्तिक चिन्हात नारकी, तिर्यञ्च, मनुष्य व देवता या जीवाच्या चार श्रेणी दाखविल्या आहेत. ज्याची आसुरी वृत्ती आहे तो नरकात राहतो, तोच नारकी होय. पशु, पक्षी, कीटक-पतंग इत्यादी रुपामध्ये जन्म घेणारे तिर्यञ्च होत. नरदेही मनुष्य व वैक्रियिक शरिरी देवता असते.

तीन बिंदु त्रिरत्नांचे प्रतीक आहेत. "सम्यग्दर्शनज्ञानचारित्राणि मोक्षमार्गः" ( आचार्य उमास्वामी तत्वार्थसूत्र १।१ ) त्रिरत्नावर असणारा अर्धचंद्र जीवाच्या निर्वाण कल्पनेचा निदर्शक आहे. जीव, स्वर्ग, मर्त्य व पाताल या तीनही लोकात सर्वत्र व्याप्त आहेत. नारकी जीव धर्मामुळे देवता बनू शकतो व त्रिरत्नांच्या आधाराने मोक्ष प्राप्त करु शकतो. स्वस्तिकाचे चिन्ह असलेले मोहंजोदराच्या उत्खननातही अनेक शिक्के मिळाले आहेत. विव्दानांच्या मने पाच हजार वर्षापूर्वीच्या सिंधु संस्कृतीमध्येही स्वस्तिक पूजा होती.

## धर्म-चक्र

त्रिजगद्वल्लभः श्रीमान् भगवानादिपूरुषः । प्रचक्रे विजयाद्योगं धर्मचक्राधिनामकः ।।

आचार्य जिनसेन महापुराण ( २५।२४४ )

अथ पुण्यैः समाकृष्टो भव्यांनां निःस्पृहः प्रभूः देशे-देशे तमश्छेत्तुं व्यचरद् भानुमानिव ।।

तत्रातिशयसम्पन्नो विजहार जिनेश्वरः । तत्र रोगग्रहातंकशोकशंकापि दुर्लभा ।।

धर्मशमाभ्युदय (२१।१६६, १७३ ).

त्रिलोकनाथ धर्मचक्राचे आधिनायक भगवान आदिपुरुष वृषभनाथ तीर्थंकरांनी अधर्मावर विजयाचा, धर्म प्रभावाचा प्रारंभ केला. निस्पृह प्रभूंनी सूर्यासमान कित्येक देशात व्याप्त अज्ञान अंधःकार निवारणार्थ विचरण केले. ( अतिशयांनी ) संपन्न भगवान वृषभदेवांनी जेथे जेथे विहार केला तेथे तेथे सुखशांतीचा प्रसार झाला. कारण की प्रभूंच्या मंगलविहारामध्ये रोग, गृहपीडा वा शोक यांना स्थानच नव्हते.

सम्मद्दंसणतुंबं दुवालसंगारयं जिणिंदाणं । वयणेमियं जगे जयइ धम्मचक्कं तवोधारं ।।

भगवती आराधना ( ७।१८६५).

जिनेंद्र वृषभदेव महावीरांचे धर्मचक्र जगात जयवंत होऊन प्रवर्तित होत आहे. या धर्मचक्राचे सम्यग्दर्शन रुप मध्य केंद्र आहे. आचारांदिक व्दादश अंग त्याचे आरे आहेत. पंच महाव्रत इत्यादी रुपाचे त्यांची धुरा आहे. तप त्याचा आधार आहे. असे भगवान जिनेंद्रदेवाचे धर्मचक्र अष्टकर्माना जिंकून परम विजय प्राप्त करते.

जैन शासनात धर्मचक्राची विविध रुपे आढळतात. शास्त्रामध्ये धर्मचक्राच्या या रुपांचे स्पष्ट वर्णन केलेले आहे. शिवकोटी आचार्यांच्या भगवती आराधना या ग्रंथात बारा आरे असलेल्या धर्मचक्राचे वर्णन केले आहे. हे बारा आरे जिनवाणीच्या व्दादशांगाचे प्रतिक आहेत. चोविस आरेवाले धर्मचक्र चोवीस तीर्थंकरांचे प्रतीक आहे. सोळा आरे असलेले धर्मचक्रही प्राचीन प्रतिमांच्या बरोबर आढळते. महाकवि असग वर्धमानचरितामध्ये सूर्याप्रमाणे सहस्त्र किरणे असलेल्या धर्मचक्राचे वर्णन केले आहें. ते धर्मचक्र तीर्थंकरांच्या

पुढे पुढे पुढे चालते असे मानतात. याशिवाय प्राचिन कलाकृतीमध्ये जिनबिम्बाच्या वर व चरणामध्येही धर्मचक्र आढळते. या धर्मचक्राची पूजा करीत असलेले श्रावकगण काही ठिकाणी दाखविलेले आहेत. जैनांनी चावीस तीर्थंकारांचे प्रतीक म्हणून चोवीस आरे असलेले धर्मचक्र मान्य केलेले आहे.

क्षेमं सर्वप्रजानां प्रभवतु बलवान् धार्मिको भूमिपालः ।

काले काले च वृष्टिं वितरतु मघवा व्याधयो यान्तु नाशम् ॥

दुर्भिक्षं चौर्यमारी क्षणमपि जगतां मा स्म भूज्जीवलोके ।

जैनेंद्र धर्मचक्रं प्रभवतु सततं सर्वसौख्यप्रदायि ॥

संपुर्ण प्रजेचे कल्याण होवो. भूमिपाल धार्मिक व बलवान राहून शासनात प्रभावशील होवो. यथासमयी आवश्यकतेनुसार मेघ वर्षा करोत. समस्त रोगांचा नाश होवो. चोरी, महामारी व अकाल मृत्यू वा दुष्काळ, जगात एक क्षणभर देखील राहू नयेत. व सर्वदा व सर्वथा जगामध्ये सुकाळ राहो. सर्व जीवांना सुखशांती प्रदान करणारे 'जिन-शासन' रुपी धर्मचक्र जे उत्तम क्षमादि दशांगपूर्ण आहे ते विश्वात सर्व काल प्रसारित राहून अनंत सुख देत राहो.

ओं नमो धर्मचक्रधिपतये सौभाग्यमस्तु संसारचक्रशांतिरस्तु ॥

सम्पूजकानां प्रतिपालकानां यतींद्रसामान्यतपोधनानाम् ।

देशस्य राष्ट्रस्य पुरस्य राज्ञः करोतु शांतिं भगवान् जिनेंद्र ॥

हे तीर्थंकर वृषभदेव-महावीर जिनेंद्र कृपया आपण पूजाअर्चा करणारे, प्रतिपालक, यतींद्र, सामान्य तपस्वी व देश राष्ट्र नगर व ग्राम इत्यादींच्या शासकांसाठी नित्य शांतिकारक व्हावे.

प्रतिष्ठातिलक इत्यादी प्राचीन जैन शास्त्राधारे जैनध्वज केशरी रंगाचा, स्वस्तिक चिन्हांकित असा त्रिकोणकृतीचा मानला जातो. तसेच-

पूज्य उपाध्याय मुनिराज १०८ श्री विद्यानंदजी यांनी भ. महावीरांच्या २५०० व्या निर्वाण महोत्सावाच्या वेळी संशोधन करुन जैन संप्रदायाप्रमाणे पंचरंगी ध्वज पंचपरमेष्ठीचा द्योतक असल्याचे साधार दाखवून दिले आहे.

जैन शासनाचा ध्वज पांच रंगाचा आहे. त्यात क्रमशः समान प्रमाणात अरुणाभ,पीताभ, श्वेताभ, हरिताभ आणि गडद नीलाभ रंगाच्या आडव्या पटट्या असतात. श्वेत पटट्ीवर मधोमध स्वस्तिक चिन्ह सुवर्णाक्षरात अंकित केलेले असते. स्वतिकाची उंची श्वेतपटट्ीच्या उंची एवढी असते म्हणून इतर पटट्यापेक्षा पांढ-या रंगाची पटट्ी जरा अधिक रुंद असते.

पंचरंग पंचपरमेष्ठी-स्थापत्य व मूर्तिकला विषयक सुप्रसिध्द ग्रंथ 'मानसार' ( इ.स.५वे शतक) मध्ये पांच परमेष्ठींच्या प्रतिमांच्या पंचरंगाचे निरुपण केले आहे.

स्फटिकं हरितरक्तं च पीतश्यामनिभं तथा । एतत्पञ्चपरमेष्ठीनां पंचवर्णं यथाक्रमम् ।।

अध्याय ५५

पांच परमेष्ठीच्या पांच प्रतिमा यथाक्रमाने पुढील रंगाच्या असतात. १. स्फटिक ( धवल ), २.अरुणाभ , ३. पीताभ ४. हरिताभ ५. नीलाभ.

हा पांच रंगाचा ध्वज पंच परमेष्ठीचे प्रतीक आहेच, पण त्याचबरोबर श्लेषार्थने याला पंच अणुव्रत व पंच महाव्रताचेंही प्रतीक मानले जाते. अणुव्रत श्रावकासाठी व महाव्रत श्रमणासाठी असते. धवल रंग अहिंसेचा, अरुणाभ रंग सत्याचा, पीताभ रंग अचौर्याचा, हरिताभ रंग ब्रम्हचर्याचा व नीलाभ रंग अपरिग्रहाचा द्योतक मानला जातो.ही संगती देखील फार उपयुक्त मानली जाते. पंच परमेष्ठीमध्ये अरिहंत व पंच व्रतामध्ये अहिंसेचे महत्व यात केंन्द्रीभूत असल्याने पांढ-या ( धवल ) रंगाला ध्वजाचे केंन्द्रीभूत स्थान दिले आहे.

## संस्कृती

संस्कृती राष्ट्र व समाजाच्या गतिमानतेचे प्रतीक म्हणजेच संस्कृतीच्या माध्यमानेच जनमानसाचा अभ्यास करता येतो. चिरंतन भावना, कामना व मन्तव्य यांची आधारशिला म्हणजेच संस्कृती. ज्या राष्ट्राची संस्कृती विशाल,उदार असते तेच राष्ट्र सर्वश्रेष्ठ समजले जाते व जगात ते राष्ट्र आदरणीय ठरु शकते. अशा राष्ट्राचे श्रेष्ठत्व इतिहासाच्या पानापानावर दृष्टिगोचर होत असते. या उलट अवनत संस्कृती केव्हाही पददलित केली जाऊ शकते व अशी संस्कृती कोणत्याही क्षणी धूसरीत होऊन विनाश पावते. संस्कृती शब्द सम् उपसर्गाच्या बरोबर संस्कृत 'कृ' धातूपासून बनलेला आहे. त्याचा मूळ अर्थ साफ करणे किंवा परिष्कृत करणे किंवा परिष्कृत करणे असा आहे. संस्कृती या शब्दाचा उपयोग व्यापक व संकीर्ण या दोन अर्थाने होतो. मानवी विज्ञान व्यापक अर्थाने संस्कृती शब्दाचा प्रयोग मानवी जीवनासाठी करण्यात येतो. या अर्थाने सामाजिक परंपरेनुसार मिळणा-या ज्ञानाला किंवा व्यवहाराला संस्कृती शब्द वापरला जातो. काहीसा सामाजिक प्रथांच्या पर्यायी अर्थाने संस्कृती शब्द वापरण्याची प्रथा आहे. संकीर्ण अर्थाने संस्कृती एक वांछनीय वस्तू मानली जाते. या अर्थाने संस्कृती व्यक्तित्वाला परिष्कृत किंवा समृध्द बनविणा-या गुणांचा समुदाय समजली जाते. मानवी विज्ञानानुसार संस्कृती व सभ्यता हे पर्यायवाची शब्द डॉ. दिनकर यांच्या मतानुसार संस्कृती मानवी जीवनाची एक पध्दत आहे. अनेक शतकानुशतके ही चालत आलेली असून कोणत्याही काळातील मानवी जीवन समाज जीवनात ती अस्त्वित असते, मानवी जीवन पूर्णपणे व्यापलेल्या,अनेक शतकांच्या अभावामुळे रचना व विकासात्मक बदल होत जाणा-या पध्दतीला संस्कृतीला संस्कृती समजण्यात येते.

संस्कृती स्वतःच विकसनशील असते. त्यामुळे स्वतः विकसित होऊन संबंधित समाजाला सतत विकासाप्रत जाण्याची प्रेरणा देण्याची काम संस्कृती करते. प्रगतीशीलता हेच संस्कृतीचे खरे लक्षण आहे. पंडित सातवलेकर आपल्या 'वैदिक संस्कृतीचे मूलमंत्र' नावाच्या लेखात लिहीतात, 'मनुष्याजवळ इंद्रिय,मन,बुध्दि व आत्मा इतक्या शक्ति आहेत, प्रत्येक माणसाजवळ या शक्ती असून प्रत्येक शक्ति संवर्धित होणारी संस्कार संपन्न होणारी आहे. या शक्तिसंवर्धनामुळे व संस्कारसंपन्नतेमुळे मानवाला अतिमानव वा

परिपूर्णमानव बनविणे हे संस्कृतीचे ध्येय आहे. यालाच जीवाचा शिव, नराचा नारायण, बध्दचा मुक्त होणे असे म्हणतात. संस्कृतीचे हेच अंतिम साध्य असते.'

संस्कृती व सभ्यता यात अंतर आहे. सभ्यता म्हणजे अशा प्रकारचे आविष्कार, उत्पादनाची साधने, सामाजिक व राजकीय संस्था, की ज्यामुळे मनुष्य आपली जीवनयात्रा सरळ व स्वतंत्रतेच्या मार्गाने आक्रमीत असतो. संस्कृती म्हणजे अशा प्रकारे चिंतन व कलात्मक सर्जनाच्या क्रिया की ज्या मानवी जीवन अगर व्यक्तिमत्वाला प्रत्यक्ष उपयोगी पडत नसल्या तरी, मानवी जीवन समृध्द बनवितात. या दृष्टीकोनातून विविध शास्त्र, दर्शने इत्यादीमध्ये आढळणारे चिंतन, साहित्य, चित्रांकन इत्यादी कला, नैतिक आदर्श इत्यादींना संस्कृती ही संज्ञा देता येईल. मोक्ष धर्म व पूर्णत्वाचा शोध यालाही संस्कृतीचे अंगच समजावे लागेल. व्यापक अर्थाने कोणत्याही देशाच्या संस्कृतीत 'मानवी जीवन व व्यक्तित्वाच्या त्या रुपाला पाहता येईल, जे देश व विदेशात महत्वपूर्ण मूल्याचे अधिष्ठान समजले जातात.' संस्कृती अंत:करण असून सभ्यता म्हणजे शरीर होय. संस्कृती स्वत:स सभ्यतेध्दारा व्यक्त करते, संस्कृती म्हणजे समाजाच्या विचारांचा एक साचा होय. संस्कृती म्हणजे एक बिंदू की जेथे मानवी जीवनाच्या सर्व समस्यांचे दर्शन होते. संस्कृतीचे एकच स्वरुप राहात नाही तर नवनवीन विचारानुसार, समसज प्रक्रियेनुसार ती बदलत जाते. सभ्यतेचे अनुकरण करता येत नाही. आचरणाने किंवा अनुकरणाने संस्कृती बदलत नसून विचारांच्या संघर्षाने ती बनते, किंवा बिघडते बदलली जाते.

संस्कृती बौध्दिक विकासाची अवस्था सूचित करते तर अभ्यतेचा परिणाम शारिरिक व भौतिक विकास हा आहे. संस्कृतीचा संबंध आत्म्याशी आहे तर सभ्यतेचा संबंध कर्मकलापाशी आहे त्यामुळेच कोणत्याही समाजाच्या संस्कृती व सभ्यतेविषयीचा योग्य निर्णय घेण्यासाठी त्या समाजाच्या पारमार्थिक,सामाजिक, राजनैतिक,धार्मिक व कलाविषयक कार्याचे परिक्षण करणे आवश्यक आहे. समृध्द सभ्यतेतच संस्कृतीचा विकास होतो व अशा ठिकाणीच दर्शन, साहित्य, नाटक,कला विज्ञान व गणित इत्यादींचीही प्रगती होत जाते. म्हणजेच संस्कृती कोणत्याही समाजाच्या बौध्दिक उन्नततेची पर्याययवाची आहे तर सभ्यता भौतिक विकासाच्या समानार्थी आहे.

संस्कृतीची प्रमुख दोन रुपे असतात. एक लोक संस्कृती व दुसरी लोकोतर संस्कृती किंवा ग्राम संस्कृती व नागरिक (नागरी) संस्कृती. लोक संस्कृती लोकोतर संस्कृतीची आधारशीला आहे. तिच्याच आधारावर लोकोतर संस्कृती, फुलते, फलते, प्रगती करते. लोकेतर संस्कृतीमागील लोक संस्कृतीचे मूळ तत्व किंवा पायाभूत तत्व कधीही सुटत नाही. भारतीय लोकसंस्कृतीची भिन्नतेत एकता, परिवर्तनीय बाह्रयता पण तात्विक स्थिरता , मानवता व सहिष्णुता प्रकृतीचे अभिन्न संबंध, सत्य परिपालन, विद्या व कलांची प्रगती, आध्यात्मिक विकास, ज्ञानाची वैशिष्ठ्ये आहेत.

## जैन संस्कृती

जैन संस्कृती प्ा्रचीन आहे. ही बौध्द संस्कृतीमुळे प्रभावित झालेली मानणे अनुचित आहे. त्याचप्रमाणे बौध्द संस्कृतीला या संस्कृतीचे अंग मानणेही उचित होणार नाही. ही संस्कृती स्वतंत्र व्यापक, भौतिक व चिरंतन असून हिला दुस-या कोणत्या संस्कृतीने बध्द केले आहे असे योग्य होणार नाही अनेक संस्कृती समन्वयामुळे निरंतर प्रभावित होत असल्या किंवा दीर्घकाळातील साहचर्यामुळे सांस्कृतिक सामंजस्य निर्माण झ ाले असले तरी त्यापैकी कोणतीही एक संस्कृती दुसरीवर आधारित आहे असे म्हणता येणार नाही, तर त्यांच्यातील दीर्घकालीन साहचर्याचे ते प्रतीक असते.

वैदिक संस्कृतीपेक्षाही जैनसंस्कृती प्राचीन असून विश्वातील संस्कृतींना कोणत्या ना कोणत्या स्वरुपात तरी तिने प्रभावित केले आहे. वेदाच्या अध्ययनावरुन हे सिध्द आहे की जैन तीर्थंकरांचा यात उल्लेख आहे. वेदात जैन संस्कृती कोणत्या स्वरुपात चित्रीत झालेली आहे, डॉ. राधाकृष्णन् लिहितात. 'जैन परंपरेनुसार ऋषभदेवापासून जैनधर्माची प्रस्थापना झाल्याचे सांगितले जाते, जे अनेक शतकाच्या पूर्वी होऊन गेले. इसवीसनपूर्व पहिल्या शतकात प्रथम तीर्थंकर ऋषभदेवाची पूजा होत होती. याला प्रमाणं आढळतात, जैनधर्म पार्श्वनाथ व वर्धमान यांच्यापूर्वी होता याबाबतीत कोणतीही शंका नाही. यजुर्वेदात ऋषभदेव, अजितनाथ व अरिष्टनेमि या तीन तीर्थकरांच्या नावांचा उल्लेख आढळतो. भागवत पुराणही ऋषभदेव जैनधर्माचे संस्थापक असल्याचे समर्थन करते' (Indian Philosophy Vol I.P.२६७). श्री. कामताप्रसादजी जैन यांनी अनेक योग्य पुरावे देऊन प्राक् ऐतिहासिक काळातही जैनधर्माचा प्रचार व प्रसार असल्याचे मत दिले आहे.

विश्वमैत्री व जगातील सर्व मानव जातीच्या कल्याणाची भावना ठेवून प्रचार करणारी प्राचीन जैन संस्कृती आजही त्याच स्वरुपात अस्तित्वात आहे. तिला अनेक संघर्षाच्या ज्वालेतून व विनाशक हल्ल्यामधून स्वतःचे संरक्षण करावे लागले. त्यामुळे विश्वाने तिची उपयुक्तता जाणूनच तिला आत्मसात केले. भ जिनेंद्रद्वारा प्रस्थापित जैनसंस्कृती सांगते की, प्राणिमात्रांच्या रक्षणातच मानवी जीवनाचे हित आहे. आत्म्याची शुध्दी हे खरे कल्याणाचे प्रमुख साधन आहे व बाह्रय शुध्दीने होणे संभवनीय नाही. अहिंसा ही या संस्कृतीची जीवन शक्ती आहे. आत्म परिष्कार, आत्म प्रबोधन, आत्म विश्वास, पर चिंतन, पर-चितंन परित्याग इत्यादी भावना जैन संस्कृतीत आहेत.

जैन संस्कृती मानवाच्या परम उत्थानावर विश्वास ठेवतो, प्रमाणाच्या साह्याने सिध्द करते की, आत्मा आपल्या प्रयासाच्या व साधनांच्या सहाय्याने परमात्मा बनू शकतो. ईश्वराच्या समान आत्म्याला मानणारी ही एकच संस्कृती आहे. अन्य संस्कृती एका विशिष्ठ ईश्वराला मानतात व जीव ईश्वर बनू शकत नाही, केवळ ईश्वराच्या अनुकंपेने व शास्त्रमध्ये लिहिलेल्या साधनानी त्याची समीपता मिळवता येते असे सांगतात. अशा स्थितीत जैन संस्कृतीने सांगितलेले आत्म्याचे वेगळेपण महनीय आहे.

आत्मशुध्दीला प्राधान्य देणा-या जैन संस्कृतीचा संदेश आहे की, गंगा, यमुना इत्यादी नद्यांच्या स्नानाने मुक्ति मिळू शकत नाही किंवा आत्मदाह बलिदान, जीवनदान ही मुक्तीची साधने नाहीत. जोपर्यंत आत्म्याची परिशुध्दी होत नाही तोपर्यत मोक्ष-प्राप्ती असंभव आहे. अशा प्रकारे कर्मवादाचे प्रतिपादन करुन जैन संस्कृतीने स्पष्ट केले आहे की, जीवाला आपल्या कर्माचा सहारा घेणे आवश्यक आहे. दुस-याच्या मदतीने किंवा कोणत्या विशिष्ठ शक्तीच्या अनुकम्पेमुळे जीवाचा उध्दार होऊ शकत नाही. प्रत्येक आत्मा कर्म करण्यात व त्या कर्माची फले भोगण्यात स्वतंत्र आहे. जैन संस्कृतीने, कोणी विशेष शक्ति जीवाला कर्म करण्याची प्रेरणा देते व त्याच्या संकेतावर जीव कर्मरत होतो हे अमान्य केले. उलट आत्मा स्वतः कर्म करतो, त्याची फळे भोगतो, स्वतः संसारात भ्रमण करतो व या भवभ्रमणातून मोक्ष संपादन करतो असे प्राधान्याने प्रतिपादन केले.

स्वयं कर्मकरोत्यात्मा स्वयं तत्फलमश्नुते । स्वयं भ्रमति संसारे स्वयं तस्माद् विमुच्यते ॥

जैन संस्कृतीचे परमाधारक पूज्य आचार्य श्री. अमितगतींनी जैन संस्कृतीच्या कर्म सिध्दांन्ताचे निरुपण पुढील प्रकारे केले आहे.

स्वयं कृतं कर्म यदात्मना पुरा । फलं तदीयं लभते शुभाशुभस् ॥

परेण दत्तं यदि लभ्यते स्फुटं स्वयं कृतं कर्म निरर्थक तदा ।

निजार्जित कर्म विहाय देहिनो न कोऽपि कस्यापि ददाति किंचन ।

विचारयन्नेवमनन्यमानसः परो ददातीति विमुच्च शेमुशीम् ा

आत्मा ज्याप्रमाणे कर्म करतो त्याप्रमाणे त्याला शुभाशुभ फले प्राप्त होतात. जर त्याला दुस-या कृत कर्माची फलांची प्राप्ति होते असे मानले तर त्याचे स्वतःचे कृतकर्म निरर्थक होऊन जाईल. प्रत्यक्षात स्वत: केलेल्या कर्माशिवाय कोणी कोणालाही फलप्रदान करण्याच्या समर्थतेचा नाही. याची परिपूर्ण जाणीव ठेवून दुस-याकडून फलप्राप्तीच्या आशेचा पूर्णपणे त्याग केला पाहिजे.

चित्त वृत्तींच्या परिष्कारार्थही जैन संस्कृती अधिक सजग ( जागृत प्रभावी मत मांडणारी ) आहे.

जैसो खाय अन्न वैसो होय मन्न । जैसो पिये पानी वैसी होय वानी ा

या लोकोक्तीची जननी जैन संस्कृती आहे. म्हणूनच जैन संस्कृतीत आहार-विहारांच्या नियमासंबंधाने माहिती सांगितलेली आहे, हाच विशुध्द आहार मानवी व्यक्तित्वाला परिष्कृत करतो व त्यामुळेच चेतनाही जागृत होतात.

डॉ. नेमिचंद्रांच्या मते संस्कृती ही मानवतेची प्रतिष्ठापिका आहे. हीच असत्याकडून सत्याकडे, अंधकाराकडून मृत्यूकडून अमरत्वाकडे व अनैतिकतेकडून नैतिकतेकडे मानवाला नेण्याचे कार्य करते. मानवी असलेल्या देवदानव प्रवृत्तीच्या संघर्षात दानवी प्रवृत्ती नष्ट करण्याचा प्रयत्न करुन, दैवी साहाय्यानेच होऊ शकते. संस्कृती मानवतेला परिष्कृत करुन तिच्यात सुविचारांचा अंकुर कालांतराने कल्याणप्रद बनून सुस्वादरुपी फळे प्रदान करु लागतो. म्हणूनच वस्त्राभूषण, क्रिया-कल्प इत्यादींना सुसंस्कृत करुन जीवन व्यतीत करणे हे सांस्कृतीक प्रेरणेचे प्रतिफल आहे. मानवता आपल्या आंतरिक भावनेतूनच ( भावतत्वातूनच ) निर्माण होते व या भावनेचा विकास मनुष्याच्या मूलभूत प्रयत्नानेच होऊ शकतो.

ईश्वराच्या संबंधाने जे विचार जैन संस्कृतीने प्रतिपादन केले आहेत ते फारच मौलिक आहेत. जैन धर्माने मान्य केलेला हा 'ईश्वर' जगाशी कोणताही संबंध ठेवीत नाही. सृष्टीच्या संचालनाचा तो प्रवर्तक नसून, मानवाच्या जीवनातही तो कोणत्याही प्रकारचा हस्तक्षेप करीत नाही. कोणाच्या स्तुतिसुमनांनी तो प्रसन्न होत नाही तर कोणाच्या निंद्‌ानालस्तीने दुःखीही होत नाही. कोणाला ऐश्वर्य वैभव किंवा अपराध्याला शासन देण्याचेही कार्य तो करीत नाही. जैन सिध्दांतानुसार सृष्टी स्वयंसिध्द आहे. जीव आपल्या स्वकर्मानुसार सुख दु:ख प्राप्त करतो, त्यामुळेच या अवस्थेत मुक्तात्मा किंवा अर्हतांनाही याबाबतीत लक्ष घालण्याचे कारण उरत नाही कारण स्वकर्मानुसार ते कृतकृत्य झालेली असतात व त्यांनी काही करण्याचे राहिलेले नसते. म्हणजेच जैन धर्मात ईश्वर स्वरुप मानल्या गेलेल्या अर्हतांचा किंवा मुक्तात्म्यांचा विश्वाचा निर्माता पालनकर्ता समजल्या जाणा-या ईश्वराशी कोणताही संबंध नाही. विश्वाची निर्मिती करणारा, पालन करणारा असा कोणताही ईश्वर नसल्याचे जैन दर्शनात मोठ्या प्राधान्याने प्रतिपादन केले आहे व त्या दृष्टीकोनातूनच जैनधर्म निरीश्वरवादी समजला जातो. अशा प्रकारच्या ईश्वराला जैन धर्मात कोणतेही स्थान नाही.

'अहिंसा' तत्व हा जैन संस्कृतीचा खास मानबिंदू आहे. या तत्वामुळेच विश्वमित्रत्व प्रस्थापित करुन ती लोकप्रिय बनली आहे. अहिंसाच मानवतेला प्रबुध्द बनविते आणि समाजवाद व साम्यवाद व साम्यवादाला परिपुष्ट करते. अहिंसेला जैन संस्कृतीत 'परम श्रेष्ठ धर्म अहिंसा परमो धम्मो' मानलेले आहे. अहिंसेतच सत्य,शिव व सुंदरतेचे संस्कार असतात, अहिंसा प्राणीमात्रांना जगण्याचा अधिकार देते, प्रत्यक्षात कोणत्याही प्राण्याला कष्ट न देणे व त्याच्या प्राणाचा वध न करणे यासच अहिंसा मानली जाते. मन, वाचा व शरीराची शुध्दि अहिंसेच्या साहाय्याने शक्य आहे. जैन संस्कृतीनुसार अहिंसक व्यक्ति कोणाचेही वाईट चिंतीत नाही त्याचप्रमाणे रागव्देषादि भावनाही संतप्त करीत नाही. प्राणीमात्रामध्ये मैत्रीची भावना अहिंसा निर्माण करु शकते. जगा व जगू द्या हा अहिंसा तत्वाचा चिरंतन संदेश आहे.

जैन संस्कृतीने सार्वभौमिक शांति व मैत्रीसाठी अपरिग्रहवादाच्या तत्वाला विशेष महत्व दिले. अनावश्यक संग्रह, विषमता, व्देष, विध्वंस इत्यादीना जन्म देत असल्याने जर मानवाने अनावश्यक संग्रह करण्याच्या सवयीचा त्याग केला तर या विक्षुब्ध जीवनामध्ये लवकरात लवकर शांततेची प्रस्थापना होऊ शकेल. असा चिरंतन संदेश जैन संस्कृतीने दिला आहे. अनावश्यक संग्रह हेच पापाचे प्रमुख कारण असल्याने जैन संस्कृती संग्रह न करता वितरण करण्याचा आदेश देते. शंभर हातांनी मिळवा पण हजार हातांनी त्याचे वितरण करा कारण विभाजन वितरण न करणारास मोक्षाची कधीही प्राप्ति होत नाही. प्रत्यक्षात जैन अपरिग्रहवादही समाजवाद आहे. अपरिग्रहवाद सामन्तवादी ( महाजनसत्तेचा सरदारशाहीचा ) शोषणाचा नाश करुन प्रजातांत्रिक शासना बनवू शकतो.

अपरिग्रहवादाला आत्मसात करणारी जैन संस्कृती अनेकांतवादाकडेही विशेष आकर्षित झालेली आहे. अनेकांतवाद संकुचित दृष्टीकोनाला उदार बनवितो व पदार्थ विज्ञानाच्या अध्यसनास व्यापक माध्यमाची निर्मिती करतो. पदार्थाला अनेक गुण असतात, हे प्रयोगाशिवाय सिध्द आहे. दुसऱ्या शब्दात असे म्हणता येईल की, वस्तूच्या स्वरुपाचे निरुपण करताना स्याद, कदाचित या शब्दाचा उपयोग करणेही संस्कृतीच्या व्यापक दृष्टीकोनाचे परिचयात्मक स्वरुप आहे. स्याद्वाद किंवा अनेकांतवाद व्यापक दृष्टीकोनाची देणगी देतोच त्याचबरोबर अनेकातवाद विरोधात्मक भावना दूर करुन, स्वस्थ चिंतनाची जागरूकता प्रदान करतो. उदाहणार्थ, एक पूरुष आपल्या मुलाचा पिता आहे तोच पुरुष त्याचवेळी आपल्या पित्याचा पुत्रही असतो. म्हणून पितृत्व व पुत्रत्व असे अनेक धर्म गुण एकाच वेळेला एकाच पुरुषामध्ये विद्यमान असू शकतात. म्हणूनच अनेकांतवाद हा संशयवाद नसुन समन्वयवाद आहे. सत्याकडे जाण्याचा एक सुगम मार्ग आहे. एकांतिक दृष्टीकोनातून कुधर्मीय पदार्थाचे प्रतिपादन करणे भ्रमात्मक आहे, त्यामुळे पूर्ण सत्यज्ञान प्राप्त होत नाही. अनेकांतवादामुळे पूर्ण सत्य समजू शकते. म्हणूनच अहिसावादाप्रमाणेच अनेंकांतवाद हे जैन संस्कृतीचे अभिन्न अंग असून जगाला मिळालेली मौलिक देणगी आहे.

' शरीरमाद्यं खलु धर्मसाधनम्' शरीर धारणा झाली तरच धर्मसाधना करता येणार आणि ते देखील शरीर निरोगी असेल तरच. यासाठी व्यवहार आचारात जैनचार्यांनी आहायविहाराबाबतीत बारीकपणे लक्ष घातले आहे. भारतीय संस्कृती आध्यात्मप्रधान आहे. ज्यामुळे मनुष्य धर्ममार्गापासून च्युत होतो, मनात विकृति निर्माण होते असा आहार त्याज्य मानला आहे. अभक्ष, मादक आहार सेवनाने धर्मसाधना होऊ शकत नाही. यासाठी जाणत्याने भक्ष्याभक्ष्याचा विचार आधी केला पाहिजे. सात्विक आणि शुध्द आहार तो देखील भुकेपेक्षा कमी घ्यावा. वेळोवेळी शक्तीप्रमाणे उपवास करुन शरीर निरोगी आणि कार्यतत्पर ठेवावे. शरीर, आहार आणि मन यांचा आत्माशी फार जवळचा संबंध आहे.

जैनधर्म अहिंसाप्रधान आहे. हिंसेमुळे मनाची तशीच विश्वाची शांति नष्ट होते. ज्या खाद्य पदार्थामुळे अधिक हिंसा होते असे पदार्थ जैनधर्मात त्याज्य मानले आहेत. मांसाहाराने तसेच मादक पदार्थाच्या सेवनाने अनेक प्रकारचे रोग उत्पन्न होऊन शरीर देखील निकामी होते. मांसाहारात जशी जीवाहिंसा होते त्याचप्रमाणे न गाळता पाणी प्याल्याने देखील असंख्य जीवांची हिंसा होते. वनस्पति भक्षणात देखील सारासार विचार हवा. ज्यामुळे मनोविकारात वाढ होईल अशा प्रकारची अनन्तकायिक कन्दमुळे आदि देखील ' अल्प फल बहुविघातक' असल्यामुळे खाऊ नयेत. मद्य, मांस, मधु यांचा तसेच पाच उदुंबर फळांचा त्याग मूळ गुणात समाविष्ठ केला आहे. मन पवित्र असेल तरच कृति पवित्र होणार. हाच उद्देश डोळयासमोर ठेवून मादक व उत्तेजक पदार्थ खाऊ नयेत. शुध्द व सात्त्विक अल्प आहाराने धर्मसाधनेत बाधा येणार नाही. ' जगा आणि जगू द्या ' हे तत्व नेहमी दृष्ठीसमोर बाळगावे. अहिंसामय सात्त्विक मार्गानेच धर्मसाधना घडते. हाच व्यवहार धर्मातीत जैन संस्कृतीचा प्रमुख आणि कल्याणकारी हेतू आहे.

श्रमण-संस्कृतीच्या या संक्षिप्त परिचयाने जैन संस्कृतीच्या विशेषतेचे ज्ञान होते ते पुढीलप्रमाणे १) अहिंसावाद, २) अनेकांतवाद, ३) विश्वमैत्री, ४) अपरिग्रह, ५) कर्मवाद, ६) जीवस्वातंत्र्य, ७) समन्वयवाद) ८) ईश्वरविषयीच्या विशिष्ठ स्पष्ट कल्पना, ९)अवतारवादची अनुपयोगिता, १०) स्वयं निर्मित सृष्टीची संकल्पना, ११) पुनर्जन्मावर विश्वास, १२) आत्म्याच्या अमरत्वाचा स्वीकार, १३) आचार-विचारांचे महत्व, १४) बाह्याशुध्दीपेक्षा आंतरिक शुध्दीला महत्व, १५) निवृत्तीची प्रधानता, १६) आदर्शवादाची प्रतिष्ठापना, १७) मानवाच्या अतुलतीय शक्तीवर विश्वास, १८) साधना क्षेत्रातील जातिवर्ण इत्यादींची अनिर्बधता, १९) सर्वोदयाचे ध्येय, २०) प्रजातंत्रावर विश्वास व सरदारशाहीला विरोध, २१) राष्ट्रीयता, २२) बहुदेवता-वादाचा विरोध,२३)

फक्त बाह्य कर्मकांडाला विरोध, २४) व्यापक पदार्थ मीमांसा, २५) धर्मांधता व रुढीवादाला विरोध, २६) मोखसंबंधीचे स्पष्ट व मैलिक विचार, २७) चतुर्गतिसंबंधी उदार विवेचन, २८) लोक संस्कृतीच्या संबंधी प्रगाढ अनुरक्ति, २९) साधनेवर विश्वास, ३०) अंतर्मानवाच्या पूर्णतेत उन्नतीच्या उच्चांकाचे अस्तित्व, ३१) व्यवहार आचारातील शुध्द सात्विक आहार-विहार इत्यादि.

# भारतीय संस्कृतीला जैन धर्माचे योगदान

## राष्ट्रीय स्वरुप-

जैन धर्माच्या इतिहासावरुन हे लक्षात येते की जैन धर्माने भारतीय समाज-जीवन विकसीत व सुद्ढ करण्यास मदत केली आहे. जैन धर्माने समाज जीवनाचा विचार कधीही संकुचित दृष्टिकोण ठेवून केला नाही. जैन धर्माचे कार्य हे सतत एका राष्ट्रीय भूमिकेतून झाल्यामुळे सदैव उदार व उदात्त विचारसणीचा अवलंब त्यामध्ये केलेला आहे. जैन धर्मियांनी देशाच्या विशिष्ट भागाला भक्तीचा विषय केलेला नाही. प्रत्यक्ष महावीरांच्या जीवनावरुन ही गोष्ट लक्षात आल्यावाचून रहात नाही. कुठे महावीरांचा जन्म विदेहामध्ये (उत्तर बिहार ) तर कुठे त्यांचा उपदेश व निर्वाण-मगध देशात (दक्षिण बिहार ). त्याचप्रमाणे त्यांच्या पूर्वी पार्श्वनाथांचा जन्म झाला. उत्तर प्रदेशात-बनारस शहरात व तप करण्यासाठी ते सम्मेदशिखरजीवर गेले. भगवान् नेमिनाथाने पण आपले तपश्चरण, उपदेश व निर्वाण यासाठी भारतातील पश्चिम भागातील काठियावाड हे क्षेत्र निवडले. आदिनाथ तीर्थंकरांचा जन्म अयोध्येत तर तपोभूमि कैलास पर्वत.

भारतातील या क्षेत्रात अनेक मुनिपुंगवांचा जन्म,तप,निर्वाण इत्यादीमुळे देशातील प्रत्येक भाग त्यांनी आपल्या श्रध्दा व भक्तीने संस्पर्शित केला. कोणत्याही कारणामुळे जैन मुनी देशाबाहेर गेले नाहीत. अत्यंत कठीण दुष्काळ पडला तरी ते देशातच राहिले. दक्षिणेत जैन विचारांचा चांगलाच प्रभाव पडला. तामीळ देशात व त्या जवळच्या प्रदेशात मोठया संख्येने जैन आचार्य व ग्रंथकार झालेले आहेत. श्रवणबेळगोळ या ठिकाणी असलेली बाहुबलीची विशाल कलामूर्ती भारतीय प्रतिष्ठा वाढविणारी आहे. प्राचीन काळापासून भारत देशामध्ये अनेक प्राचीन धार्मिक परंपरा आहेत त्यास जैन धर्माने महत्वपूर्ण योग दिलेला आहे.

अर्थात् जैनांच्या पवित्र भुमीचा विस्तार उत्तरेस हिमालय, पूर्वेस मगध व पश्चिमेस काठियावड आणि दक्षिणेस कन्याकुमारीपर्यंत झाला.

### साहित्य व भाषायोग-

जैनधर्माने भाषा विषयाच्या बाबतीतही महत्वाचे कार्य केले आहे. वैदिक धर्मामध्ये संस्कृत भाषेसंबंधी अत्यंत आदराची भावना आहे. देववाणी म्हणून त्या भाषेत प्रचूर साहित्य निर्माण केले आहे. त्यामुळे वेद साहित्याचे रक्षण झाले पण भिन्न भिन्न देशातील लोक-भाषेस प्रतिनिधत्व दिले गेले नाही. या उलट जैन व बौध्द धर्माने धर्मोपदेशासाठी लोकभाषेचा प्रयोग केला. भगवान् बुध्दाने पाली भाषेतून उपदेश केला. परंतू ही परंपरा अनुयायांनी कायम ठेवली नाही. त्यांनी पाली भाषेतून निर्माण केले. लंका, सयाम, बर्मा आदि देशामध्ये जाऊन त्यानी आपल्या साहित्याचा अविष्कार पाली भाषेतून केला. अंतिम तीर्थंकार महावीरांनी लोक कल्याणासाठी आपल्या सुबोध अर्धमागधी वाणीतून उपदेश दिला. परंतू जैनाचार्यांनी धर्म प्रचारार्थ केवळ याच भाषेचा वापर कलो. एवढेच नव्हे तर त्यांच्या गणधरांनी देखील संकलनासाठी अर्धमागधीतूनच उपदेश केला. परंतू प्रचार कार्यासाठी जैनाचार्यांनी त्या त्या प्रदेशातील प्रचलित लोकभाषेचा प्रयोग केला. यामुळेच जैन साहित्यामध्ये विभिन्न काळातील शैरसेनी, महाराष्ट्री, अपभ्रंश, प्राकृत इत्यादी भाषाना देखील पुरेसे प्रतिनिधीत्व लाभले. त्याहूनही विशेष म्हणजे आधुनिक हिंदी, गुजराथी, कन्नड, मराठी इत्यादी भाषेतही जैन साहित्य निर्माण झाले. दक्षिणेमध्ये देखील सुदूरवर्ती तामीळ व कन्नड भाषेत प्राचीन जैन साहित्याचा दुर्मिळ संग्रह पाहावयास मिळतो. याचे श्रेय वास्तविक पाहता जैनांना आहे. जैनांना प्रांतीय भाषावाद केव्हांही शिवला नाही. या बाबतीत त्यांची पक्षपाती नव्हती.

### समन्वयाचा प्रयत्न-

जैनधर्मामध्ये इतरांच्या धार्मिक व लैकिक मान्यतेस स्थान दिले आहे. अन्य धर्मात राम, लक्ष्मण किंवा कृष्ण आणि बलराम यांच्या संबंधी ज्याप्रमाणे आदर व्यक्त केला जातो त्याचप्रमाणे जैनधर्मामध्ये

तीर्थकारांच्यासह त्रेसष्ट शलाका पुरुषांना आपल्या पुराणात स्थान दिले आहे. तसेच त्यांचे विस्तारपूर्वक वर्णन केले आहे. रावणासारख्या शत्रुना पण प्रतिनारायण संबोधून उच्च स्थान दिले आहे. रावणाला दशमुख न मानता त्या विद्याधर वंशीय मानले आहे. अग्निपरीक्षा झाल्यावर सीतेच्या पवित्र्यासंबंधी लोकांच्या मनात शंका राहू नये हा प्रसंग रामायणामध्ये मोठया कौशल्याने चितारला आहे. जैन पुराणामध्ये रावणाची राक्षसी वृत्ति दाखविण्यात आली नसून तो पापभीरु असा दाखविला आहे. त्याचप्रमाणे जैन पुराणामध्ये हनुमान सुग्रीव हे वानर नसून विद्याधर वंशीय राजे होते असे प्रतिपादन केले आहे. जैन पुराणातील कथा साहित्यात एक विशेषता आहे. त्यात संकुचित भावनेला स्थान नाही.

**उदात्त विचारांचा आधार-**

जैन दर्शनामध्ये जो अनेक वृत्तींचा संग्रह दिसतो तो स्वार्थमूलक नाही किंवा व्यवहार साधावा म्हणून जैंनानी आपल्या दर्शनात सोइस्कर बदल केले असे मानणेही चुकीचे ठरेल. वेदान्त दर्शनामध्ये केवळ चिदात्मक रुप तत्व मानून त्यास ब्रह्म असे म्हटले आहे. दृश्य जगातील पदार्थामध्ये असत् व मायारुप भेद केला आहे. कांहीनी तर केवळ भौतिक तत्वांची सत्ता स्वीकृत केली आहे व त्यांनी चैतन्य गुणाची उत्पत्ति मानली आहे. यालाच आम्ही चार्वाक म्हणतो. जैन दर्शन जीव व अजीव या दोन तत्वांचा स्वीकार करतो. त्यांनी सहा द्रव्ये मानलेली आहेत. द्रव्याचे लक्षण पण स्वतंत्रपणे केले आहे. द्रव्य म्हणजे ज्यात सत्ता गुण असेल ही सत्ता उत्पाद, व्यय व ध्रौव्य२ त्रिगुणस्वरुपी आहे. वास्तविक पाहता वेदान्त दर्शनात द्रव्याची पूर्ण सत्ता सांगितलेली नाही. त्याचप्रमाणे चार्वाक दर्शनामध्ये पण द्रव्याचा पूर्ण अस्तित्वासंबंधी विस्मरण केलेले नाही. द्रव्य हे कूटस्थ नित्य आहे हा वेदान्ती विचार सिध्द होत नाही. जगामध्ये चैतन्य गुणाने युक्त असे आत्मतत्व आहे व त्याचबरोबर चैतन्य गुणहीन मूर्तिमान भौतिक पदार्थ व अमूर्त काल-आकाश इत्यादि तत्वे आहेत. ही सर्व द्रव्ये गुण पर्यायात्मक आहेत. द्रव्यामध्ये गुणाची अवस्था ध्रुव असल्याने त्यात ध्रुवता व पर्यायाच्या अपेक्षेने त्यामध्ये उत्पत्ति व विनाशाच्या अवस्था असतात. जैन दर्शनाची दृष्टि व्यापक आहे. जैन धर्माच्या दार्शनिक सिध्दांतातील व्यापक विचारांचे प्रतिबिंब स्याद्वाद व अनेकांत रुपाने लक्षात येते.

वस्तु ही अनंत धर्मात्मक आहे. त्यातील सर्व गुणांचे कथन एकाच वेळी करणे वाक् शक्तीच्या पलीकडचे आहे. कधी द्रव्यात्मक, गुणात्मक, पर्यायात्मक नांवाने संबोधतो म्हणजे त्यांची विवक्षा कोणत्या अंशाचे कथन करणे आहे हे लक्षात घेतले पाहिजे. स्याद्वाद व अनेकांतवाद हे संघर्षातून सहकार कसा निर्माण होतो याचे उत्तम उदाहरण आहे. जर आम्ही प्रतिपादन करणाऱ्याच्या अंशिक सत्यालाच परिपूर्ण सत्य मानले तर ते चुकीचे ठरेल. तरी आम्ही विभिन्न दृष्टिकोण लक्षात घेतले पाहिजेत व आम्ही त्यात सामंजस्य स्थापन केले पाहिजे. याच दृष्टीने जैनाचार्यानी प्रत्येक वस्तूचा विचार द्रव्य, क्षेत्र, काल व भाव या चतूष्टयाप्रमाणे करण्यावर जोर दिला आहे. वस्तूचे समीचीन दर्शन व्हावे म्हणून मिथ्या एकत्वाचा त्याग कसा करावा हे जैनाचार्यानी सुगम रीतीने सांगितले आहे.

**अहिंसेचा सिध्दान्त-**

जैन धर्म हा चिंतनपर धर्म आहे. जैन धर्मात अहिंसा सिध्दांतावर विशेष जोर दिलेला आहे हे खरे आहे. संसारामध्ये अनंत जीव आहेत. प्रत्येक जीवामध्ये आत्मा आहे. हे जीव कर्मबंधामुळे विभिन्न अवस्थेमध्ये-चतुर्गती-मध्ये अनेक शरीरामध्ये दिसतात. जैनधर्मात प्रत्येक जीव अनंत शक्तिधारी मानलेला आहे. त्यामुळे सम्यग्दर्शन, ज्ञान व चारित्र्य यांच्या चरमोत्तम विकासामुळे परमपद प्रापत होऊ शकते, अशी जीवात योग्यता आहे. त्यामुळे शक्तीरुपाने सर्व जीव समान आहेत. त्यात एकाचा दुसऱ्याशी सद्‌भाव व सहयोगाचा वयवहार असतो हेच जैन धर्मातील लोकतंत्र होय. प्राणिमात्र या धर्माचा सदस्य होऊ शकतो हे तत्व यात स्वीकारले आहे. सर्वच जर एकाच मार्गाने जाणार असतील तर त्यात परस्पर सहयोग असणे स्वाभाविक आहे. जैनधर्मातील अहिंसा, सहयोग व सहिष्णूता अपूर्व आहे. त्यात प्राणीमात्रावरील दया व करुणेला महत्वाचे स्थान दिले आहे. पण कधी कधी अहिंसेच्या सिध्दांताचे निर्मल रुपाने पालन करण्यास अडचण उत्पन्न होते. म्हणून जैन धर्माने गृहस्थ व मुनीसाठी तरतमतेने कथन केले. कारण विशिश्ट मर्यादेपर्यंतच अहिंसेचे पालन करु शकतो. त्यास अणुव्रताचे पालन करण्यास सांगितले आहे व महाव्रताचे पालन मुनीकरीता सांगितले आहे. अहिंसा ही भाव व क्रियाप्रधान आहे. मनुष्य चालताना, फिरताना किंवा वरची विविध कामे करताना हिंसा होत राहते. त्याचप्रमाणे शेती, वाणिज्य आदि कार्यामध्ये पण हिंसा होते. ही हिंसा टाळता येत नाही. पण धर्मावर संकंट आले तर त्या ठिकाणी हिंसा पण वर्ज्य नाही. मुनींना मात्र

अति सूक्ष्मतेने अहिंसेच्या पालनाचा आदेश दिलेला आहे. आज अहिंसेला राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय स्वरुप प्राप्त झाले आहे.

संस्काराचा समुच्चय म्हणजेच संस्कृति होय. सुसंस्कृत व्यक्ति निश्चितच सुसभ्य असते. परंतू सभ्य व्यक्ति सुंसस्कृत असेल असे म्हणता येत नाही. सर्व जीव ( प्राणीमात्र) सुखची इच्छा करतात. दु:खापासून दूर राहाण्याचा प्रयत्न करतात. कोणी कितीही दु:खी संतप्त, कष्टी असला तरी जगूच इच्छितो. परंतू मरण पत्कारीत नाही, मरणास सर्वजण भितात. म्हणून कोणत्याही जीवाला त्रास, कष्ट देऊ नये व गुलाम बनवू नये आणि कोणत्याही वध करु नये. ही सुसंस्कृतीची प्रमुख अंगे आहेत.

जैन संस्कृति आपल्या सुखाबरोबर दुसऱ्याची सुखशांती म्हणजे दुसऱ्याच्या हिताचे रक्षण करणे श्रेष्ट मानते. जैन संस्कृतीचा हाच वज्रघोष आहे. घ्सुखसे रहो और सुखसे रहने दोङ हे जैनसंस्कृतीचे मूळ आहे. जैन संस्कृति आपल्या सुखाला, हिताला, स्वार्थाला आणि आकांक्षेला विस्तृत करते आणि त्याचे विश्वशांति, विश्व-कल्याणात परिवर्तन करते. खऱ्या अर्थाने जैन संस्कृतीस विश्वसंस्कति, मानवसंस्कृतीच म्हणतात. कारण या संस्कृतीत मानव जातीचे व सर्व प्राणीमात्राचे कल्याण, विकास साधला आहे. जैन संस्कृति नि:श्रेयसची प्रेरक आहे. जैन संस्कृति प्राणीमात्राचा उदय, हित आणि कल्याण साधते. तिच्या दृष्टीकोनातून जगातील सर्व प्राणीमात्र समान आहेत. म्हणून प्रत्येक मानवाचे कर्तव्य आहे की अशा श्रेष्ठ सुसंस्कृतीचा स्वतंत्रपणे विकास करणे. जैन संस्कृतीच्या मूलतत्वाचा अंगिकार करावा व आचरण करुन संस्कृतीचे तेज, बल वाढवावे. म्हणूनच समंतभद्राचार्यानी युक्त्यनुशासन ग्रंथात जैन धर्मास शाश्वत तीर्थ म्हटले आहे.

सर्वापदां अन्तकरं निरन्तं सर्वोदयं तीर्थमिदं तवैव // ( यु.६१)

# भ. महावीर जीवन-गाथा अर्ध्य २

**श्री महावीर स्तोत्र**

यदीये चैतन्ये मुकुर इव भावश्चिदचितः / समं भान्ति ध्रौव्यव्ययजनिलसन्तोSन्तरहिताः //
जगत्साक्षी मार्गप्रकटनपरो भानुरिव यो / महावीरस्वामी नयनपथगामी भवतु मे // १ //
अताम्रं यच्चक्षुः कमलयुगलं स्पन्दरहितं / जनान् कोपापायं प्रकटयति वाभ्यन्तरमपि //
स्फुटं मूर्तिर्यस्प प्रशमितमयी वातिविमला / महावीरस्वामी नयनपथगामी भवतु मे //२ //
नमन्नाकेन्द्रालीमुकुटमणिभाजालजटिलं / लसत्पादाम्भोजद्वयमिह यदीयं तनुभृताम् //
भवज्वालाशान्त्यै प्रभवति जलं वा स्मृतमपि / महावीरस्वामी नयनपथगामी भवतु मे // ३ //
यदर्चाभावेन प्रमुदितमना दर्दुर इह / क्षणादासीत् स्वर्गी गुणगणसमृध्दः सुखनिधिः //
लभन्ते सद्रक्ताः शिवसुखसमाजं किमु तदा / महावीरस्वामी नयनपथगामी भवतु में // ४ //
कनत्स्वर्णाभासोऽप्यपगततनुर्ज्ञाननिवहो / विचित्रात्माप्येको नृपतिवरसिध्दार्थतनयः //
अजन्मापि श्रीमान् विगतभवरागोSद्भुतगति / महावीरस्वामी नयनपंथगामी भवतु मे // ५ //
यदीया वाग्गङ्गा विविधनयकल्लोलविमला / बृहज्ज्ञानाम्भोभिर्जगति जनतां या स्नपयति //
इदानीमप्येषा बुधजनमरालैः परिचिता / महावीरस्वामी नयनपथगामी भवतु मे // ६ //
अनिर्वारोद्रेकस्त्रिभुवनजयी कामसुभटः / कुमारावस्थायामापि लिजबलाद्येन विजितः //
स्फुरन्नित्यानन्दप्रशमपदराज्याय स जिनो / माहवीरस्वामी नयनपथगामी भवतु मे // ७ //
महामोहातङ्कप्रशमनपराकस्मिकभिषङ् / निरापेक्षा बन्धुर्विदितमहिमा मङ्लकरः //
शरण्यः साधूनां भवभयभृतामुत्तमगुणो / महावीरस्वामी नयनपथगामी भवतु मे // ८ //
महावीराष्टकं स्तोत्रं भक्त्या भागेन्दुना कृतम् / यः पठेच्छुणुयाच्चापि स याति परमां गतिम् // ९ //

भ. महावीर स्तुती

भूषण वेषा वाचुनि शोभतसे तव शरीर वीर जिना /
सूर्योदुतारकाविण चेतोहरता न येइ कां गगना //

पूर्ण दयेने भरले तव मत लवही न दोष यात असे /
हिममय-चंद्रामध्ये उष्णत्वनिवास सांग करिल कसे //

निस्पृह होउनि भव्या, उपदेश तूंच देतोस /
धरितां मनि न फलाशा करी जसा जलद नीरवृष्टीस //

# जीवन-गाथा

## मातीचा सुगंध दरवळला ( गर्भ कल्याणक )

भारतभूमीच्या पवित्र पुण्यमय मातीत अनेक महापुरुषांचा नररत्नांचा जन्म होऊन ही भूमी फलद्रुप झाली आहे. त्या महान वीरपुरुषांनी भारतभूमीचे नाव जगात अविस्मरणीय, अमर करुन ठेवले. अशा भाग्यशाली देशात निसर्गसौंदर्याने नटलेला विदेहदेश ( बिहारप्रांत ) पुण्यवंत कीर्तीशाली पुरुषांच्या कर्तृत्वाने शोभून दिसत होता. विदेहदेश म्हणजे भारतभूचाच नव्हे तर जगाचा गाभाच होता. त्या पवित्र, निसर्गरम्य देशात महान प्रतापी,धर्मात्मा, महान वीर राजा सिध्दार्थ आपल्या सुपत्नी त्रिशलासह आनंदाने राज्य करीत होता. त्याच्या घरी लक्ष्मी पाणी भरीत होती. राज्यात सगळीकडे आनंदी आनंद होता. सृष्टिसौंदर्य आनंदाने बहरुन गेले होते. विदेहदेशाचा पर्यायाने भारतभूचा भाग्योदय आला. सिध्दार्थ राजा आपल्या प्रियपत्नीसह आनंदाने, सुखसमृध्दीत, धर्मचिंतनात काल व्यतीत करीत होता. राजा सिध्दार्थाचा भव्य राजमहाल ( नंद्यावर्त ) कुंडपुरीत अतिशोभिवंत व आकर्षक दिसत होता. आषाढ शुक्ल षष्ठीचा दिवस. महाराणी त्रिशलेसह नंद्यावर्त महालात सुखनिद्रा घेत असतानाच पहाटेच्या वेळी सोळा स्वप्ने पडली. त्याच स्वप्नानंदात तिने स्नान करुन जिनदर्शन घेतले व अति उत्सुकतेने आपल्या प्राणप्रिय पतिराजांकडे स्वप्नफल विचारण्यास गेली. स्वप्न ऐकताच राजा सिध्दार्थचा चेहरा आनंदतिशयाने चमकू लागला. त्याचा आनंद गगनात मावेना. महाराजाचा हर्षानंद चेह-यावर ओसंडत होता. राणीने त्रिवार वंदन करुन स्वप्नफल विचारताच महाराज म्हणाले, “हत्तीवरुन साखर वाट ! तू आई होणार !” हे ऐकून महाराणी त्रिशलादेवी लाजली. आणि जमिनीकडे पाहू लागली. राजे सिध्दार्थ आपल्या राणीस म्हणाले, “तुझ्या पोटी कुलभुषण येणार, आपल्या महापराक्रमाने तो विश्वभूषण होणार, त्रिलोकीवंद्य होणार” हाच या स्वप्नाचा मतितार्थ आहे. राजाच्या चेह-यावर आनंद नाचत होता. मन सुखस्वप्न चितारीत होते. स्वप्नात हत्ती पाहिलास याचा अर्थ तुझा मुलगा त्रिलाकाधिपती होणार, बैल दिसला तो धर्मात्मा होणार, सिंह पाहिलास - तो महापराक्रमी होणार. लक्ष्मीदर्शन झाले तेव्हा तो वैभवशाली होणार. फुलांच्या दोन माळा दिसल्या त्यावरुन तो सर्वांना शिरसावंद्य होईल. चंद्र व सूर्यदर्शनाने तो जगतापहारी व तेज:पुंज होणार. मत्स्यदर्शन तो रुपवान कामदेवालाही लाजविणार असे सुचविते. जलपूर्णकलशाने तो लोककल्याणकारी. सरोवर दर्शनाने तो जगद्‌बंधु आणि समुद्रदर्शनावरुन तो गंभीर, धैर्यवान होणार असे सुचित होते. सिंहासन- जगाचा स्वामी व देवविमान तो यतिमुनींना वंद्य होणार असे सुचविते. पृथ्वी भेदून आलेले नागभवन, रत्नराशी आणि निर्धूम अग्नि या सर्वांचा अर्थ एकच तो ध्यान धारणा करुन संसाररुपी पिंजरा तोडून मुक्तिश्रीस वरणारा होईल. ही स्वप्नफले ऐकताच त्रिशला राणीस अपरंपार आनंद झाला. आनंदाने राणीचे अंत:करण भरुन गेले. तदनंतर महाराजांना तिने त्रिवार वंदन केले आणि आपल्या जगद्‌वंद्य पुत्राचा विचार करीत आनंदात महालाकडे गेली. मनांत पुण्यशाली पुत्राचा, चत्तारि मंगलम् चत्तारि लोगुत्तमा, चत्तरि सरणं पव्वज्जामि, आणि धम्मं सरणं पव्वजामि याचे स्मरण करीत कालक्रमणा करु लागली.

त्रिशला मातेचा आनंद तर अवर्णनीय होता. आपल्या जन्माने समस्त प्राण्यांना आनंद देणारा बालक गर्भात आल्यापासून त्रिशलेचे सौन्दर्य कलाकलांनी वृध्दिंगत होत गेले. देह कांतिमान होत होता. श्री, ऱ्ही, धृति, कीर्ति इत्यादि सुंदर देवता तिच्या सेवेला हजर होत्या. त्यांच्या सेवांनी व गूढ, धार्मिक तसेच मनोरंजक प्रश्नोत्तररुपी चर्चांनी त्रिशलेची बरीच करमणूक होत होती. त्रिशला राणी वैशालीपती राजा चेटक याची ज्येष्ठ कन्या. सौंदर्य आणि सात्विकतेचा मधुर संगम. विव्दत्ता व विनय यांचा दुर्मिळ मिलाप. सुजनता व सच्चरित्र यांची मूर्तिमंत ,खाण. ती सुशिला होती, सुसंस्कृत होती, आज ती सुमाता बनणार होती. काळ आपली

वेगवान पाउले टाकीत होता. तसा राणीचा गर्भ वाढत होता. दिवसेंदिवस कुंडपुराचा कायापालट होत होता. सृष्टि नवसोन्दर्याने, नवचैतन्याने नटली होती. कुंडपुर वैभवाने तळपत होते. नगरीतील लोक सुखसागरात, आनंदात बुडाले होते. सर्वजण निश्चिंत, आनंदी झाले होते. समृध्दीच्या घरी सुखशांतीचे माहेर आले होते. सात मजली भव्य नंद्यावर्त महाल रत्नांच्या तेजाने प्रकाशला होता. राजवाड्यावर रत्नवृष्टि होत होती. दिक्कुमारी नि विद्युत्कुमारीच्या नृत्यगायनाने नंद्यावर्त महालाचे वैभव दुणावले होते.

आषाढ शुध्द षष्ठीपासून दुधात साखर पडली नि सुवर्णाला सुगंध सुटला, त्रिशला राणीचा चेहरा उजळत होता. शरीराची कांती उठून दिसत होती. दिवस मोजत मास आनंदात सुखात जात होते. पाउले जड पडू लागली. मातृत्वाची चाहूल हालचालीतून जाणवत होती. सर्वांच्या आनंदाला सृष्टिसौंदर्याने साथ दिली होती. सृष्टिसौंदर्य पुण्यप्रतापी भाग्यवंताचा जन्म होणार, दर्शन मिळणार, भाग्य उदयाला येणार म्हणून आनंदाने नाचत होते. स्वर्गातून रत्नवृष्टि होत होती त्रिशला राणीच्या सेवेत देवांगना हजर होत्या. त्या राणीबरोबर तत्वचर्चा प्रश्नोत्तररुपाने करुन करमणूक करीत होत्या. देवांगनानी व नगरवासी स्त्रियांनी त्रिशलाराणीची अमृतफलानी ओटी भरली. सर्वानी भावी जिनमाता त्रिशलाराणीचा आनंदाने जयजयकार केला दिवसेंदिवस राणीचे तत्वचर्चेत मन रमत होते. देवदेवता स्वर्गाहून येऊन जिनमाता त्रिशला राणीचा गौरव, स्तुती करीत होत्या. कुंडपुरीत त्यामुळे मातीचा सुगंध दरवळत होता. कुंडपुरीतील जनता व इंद्रइंद्राणी जगद्वंद्य, महापुरुषाच्या दर्शनासाठी उत्सुक झाले होते. आनंदाचा सुगंध सगळीकडे दरवळत होता. झाडे फळफुलानी वेढल्यामुळे पुण्यवंताच्या दर्शनासाठी जणु नम्र व उत्सुकच झाली होती. अशा रीतीने आनंदात तत्वचर्चेत, धर्मक्रियेत नऊ महिने संपत आले होते. प्रत्येक प्राणिमात्र त्या पवित्र, भाग्यशाली देदीप्यमान सुवर्णक्षणाची आतुरतेने वाट पहातच होते.

## अरुणोदय ( जन्मकल्याणक )

इसवी सन पूर्व ५९९ मधील चैत्र शुक्ल त्रयोदशीची रम्य पहाट, अडीच हजार वर्षापूर्वीचा एक शुभ दिवस. विदेह देशाची राजधानी कुंडपुरीनगरी आज नटलेली आहे, सजलेली आहे, म्हणूनच अत्यंत विलोभनीय दिसत आहे. पश्चिम दिशेला कललेल्या चंद्राने कुंडपुराच्या भव्य राजप्रसादासमोरील सरोवरात प्रतिबिंबित होऊन मधुन हास्य केले. सरोवराच्या काठावरच तो राजवाडा उभा होता. तरंगणा-या लाटांनी वा-याच्या झोलाबरोबरच ते हास्यही काठापर्यंत बागडत गेले.

त्या हास्याचा स्पर्श झालाय राजवाड्याला त्या. भव्य राजप्रासादातील एका खोलीतून बालकाच्या मंजुळ ध्वनिलहरी बाहेर डोकावल्या. राजप्रसादातील एका खोलीतून बालकाच्या मंजुळ ध्वनिलहरी बाहेर डोकावल्या. राजप्रसादातील सारे आसमंत त्या ध्वनी लहरींनी भरुन गेले, सर्वत्र पवित्रतेचे व मांगल्याचे वातावरण निर्माण झाले. सोमवार ! सर्वग्रह आपापल्या उच्चस्थानी होते, उत्तररात्री चंद्र उत्तरफाल्गुनी नक्षत्रावर आला असताना, भगवान महावीरांचा जन्म झाला. विश्वाच्या इतिहासात सुवर्णाक्षरांनी लिहून ठेवावा असा हा दिवस. वसंतऋतु प्रत्येक प्राणिमात्रावर आपला प्रभाव पाडीत असतानाच, सर्व प्रजाजन स्वप्नलहरीमध्ये मग्न असतानाच विश्वाच्या इतिहासातील ती महामेंगल वेला आली. सर्व विश्व क्षणभर आनंदाने पुलकित झाले.

रात्रभर अंधाराच्या कुशीत दडलेले पक्षी जागे झाले. आपल्या मंजुळ स्वरांनी त्यांनी ही शुभवार्ता सर्वत्र पसरविली. सर्व वृक्षवेली व कळयांना स्पर्श करीत पवनाने सृष्टिला जागे केले आणि थोड्याचवेळात सर्व दिशा प्रसन्न झाल्या. आकाश स्वच्छ झाले. कुंडपुरावर गगनातून पुष्पवृष्टि झाली. सृष्टितल्या या चमत्कारांनी कुंडपुरी जागी झाली. सर्व प्रजाजन एकमेकास विचारु लागले. आज काही विशेषता घडली वाटते! तितक्यात सर्व बाजूनी आकाशवाणी झाली.

कुंडपुराधीश राजा सिध्दार्थ आणि प्रियराणी त्रिशला यांना भाग्यशाली पुत्ररत्न झाले आहे.

हे शब्द होते दिशांचे, आकाशाचे, निसर्गाचे, पुत्रजन्माची शुभवार्ता ऐकून सिध्दार्थाच्या देहांतला अणुरेणु पुलकित झाला. एका भाग्यशाली बालकाला जन्म देऊन आपली कूस पवित्र झाली. याचे त्रिशलेला समाधान वाटले. आपल्या कांतिमान् पुत्राला पाहून तिला आनंदाचे भरते आले. प्रजा आनंदाने बेहोष झाली व थोड्याच अवधीत कुंडपुरी नटून थटून हर्ष उधळू लागली. सूर्यकिरणांचा स्पर्श होताच, किरणांना परावर्तित

करणा-या आरशाप्रमाणे कुंडापुरीने आपला आनंद सगळीकडे परावर्तीत केला. गगनालाही स्पर्श करुन हा आनंद स्वर्गाच्या दारात आदळला. तेथेही मधुर घंटानाद झाला. इंद्राचे आसन कंपित झाले. अखिल विश्वाला सर्व प्रकारच्या संभ्रमातून सोडवून त्याला ज्ञानाचा प्रकाश दाखविणारा अरुण पृथ्वीतलावर उदित झाला. त्याने आपल्या अवधिज्ञानाने हे ओळखले. त्रैलोक्याधिपती, सत्यधर्म प्रभावक महान पराक्रमी बालकाच्या जन्माची वार्ता समजताच सौधर्मादि सोळा स्वर्गातील इंद्र आपापल्या देवदेवतासह नवजातबालकाच्या स्वागतास पृथ्वीतलावर जाण्यास सज्ज झाले. अनेक प्रकारचे रत्नालंकार नि उत्तमोत्तम वस्त्रे परिधान करुन येणा-या देवदेवतांनी आकाश भरुन गेले. कुंडपुरीच्या राजप्रासादासमोर तर अनेक जण आपला हर्ष व्यक्त करण्यासाठी उभे होते. त्या घोळक्यातच स्वर्गातील देवदेवता सामील होत्या. कुंडपुरीला एखाद्या यक्षनगरीचे स्वरुप प्राप्त झाले. राजा सिध्दार्थ आनंदाने मोहरुन गेला. आपल्या सेवकाकरवी मुक्तहस्ताने तो शर्करा वाटीत होता.

भगवान महावीरांचा जन्म रात्र संपत असतानाच झाला तो जणु काय असे सुचवित होता की, जिनेंद्र सूर्याच्या आगमनामुळे पृथ्वीवरील दु:खरुपी निशेचाही आता लवकरच अंत होणार आहे. भगवंताच्या जन्मामुळे केवळ नर-नारीच सुखी झाले असे नाही तर पशुपक्षीही आनंदीत झाले, नित्य दु:खातच पिचत पडणा-या नारक्यांना देखील एक क्षणभर सुख उपभोगण्यास मिळाले. हा तीर्थकरजन्माचाच प्रभाव होय. भ. महावीरांच्या जन्मकाली सर्व जण अत्यंत आनंदित झाले होते, दु:ख जर कोणास झाले असेल तर ते मोकनीय कर्माला आणि त्याच्या कर्म परिवाराला. सामान्य जनतेवर ही कर्मे विशेषत: मोहनीय कर्म ताबडतोब पगडा बसवू शकते, परंतु नवजात बालक जितेंद्रिय असल्यामुळे कर्मपरिवाराला त्याच्यावर आपला पगडा बसविता आला नाही. म्हणूनच त्याला दु:ख होणे साहजिक होते.

## अभिषेकोत्सव व नामकरण

हत्ती, घोडे, रथ, गंधर्व, नर्तकी, प्यादे आणि बैल या सात प्रकारच्या सैन्य परिवारासह कुंडपुरीला आलेल्या इंद्रानी जन्माभिषेक करण्याचा निर्णय घेतला. नंद्यावर्त प्रासादाजवळ पोहोचल्यानंतर सौधर्मेन्द्रानें आपल्या इंद्रणीस प्रसूतीभवनात जाऊन बालकास घेऊन येण्यास सांगितले. इंद्राणीने प्रियकारिणी त्रिशलामातेजवळ जाऊन तिला प्रदक्षिणा घातल्या, बालजिनेंद्राचे दर्शन घेतले व त्रिशला राणीची स्तुती केली. 'हे माते तू तीन्ही लोंकाची कल्याणमयी माता आहेस. तू श्रेष्ठ मंगलमयी आहेस. तू पुण्यवती आहेस. यशस्वीनी आहेस. कारण सर्वच दिशामध्ये नक्षत्रे उगवतात पण किरणमालिकांनी सर्व दिशांना तेज देणारा सूर्य मात्र पूर्वदिशेलाच उगवतो. त्याचप्रमाणे जगातल्या सर्वच माता पुत्रांना जन्म देत असल्या तरी तीन्ही जगाचे कल्याण करणा-या तीर्थंकर पुत्राला जन्म देणारी तुझ्यासारखी तूच.'

तीर्थकरमातेची अशा प्रकारे स्तुति करुन इंद्रणीने त्रिशला मातेला मोहमयी निद्रेने निद्रितकेले. एक मायामय बालक तिच्याजवळ ठेवून अत्यंत श्रध्दापूर्वक भक्तीने तिने बालजिनेंद्राला उचलले बालकाच्या स्पर्शाने इंद्रणीस जो आनंद झाला त्यास सीमााच नव्हती. त्या स्पर्शाबरोबर त्रिलोकाचे सर्व वैभव आपल्याला हस्तगत झाले असे तिला वाटले. त्याला घेऊन ती निघाली त्यावेळी छत्र, चामर, ध्वजा, कलश, सुप्रतिष्ठक, झारी, दर्पण व पंखा ही आठ मंगल द्रव्ये बरोबर घेऊन दिक्कुमारी तिच्यापुढे चालल्या होत्या. अशा थाटाच्या मिरवणुकीसह इंद्राणीने तो बालक इंद्राच्या करकमलात दिला. बाल-तीर्थंकराचे ते अनुपम सौंदर्य पाहून भरतीचा समुद्र ज्याप्रमाणे उचंबळून येतो त्याप्रमाणे इंद्राचे अंत:करणही उचंबळून आले. आपल्या सहस्त्र डोळयामध्ये हे सौंदर्य मावेनासे झाल्याने हे सौदर्य कसे निरखावे हेच त्यास समजेनासे झाले. बाल तीर्थंकरांच्या मुखाचे तेजच अलौलिक होते. बाल तीर्थंकराच्या सौंदर्यानेच भारावून गेलेला इंद्र बालकाची स्तुती करु लागला. हे भगवन्, आपण तीन्ही लोकांना प्रकाशित करणारे परमज्योती आहात, त्रिलोकाचे गुरु आहात. जगाचे भाग्यविधाते आहात, त्रिलोकाचे स्वामी आहात. ज्ञानी व मुनी आपणास नेहमी वंदन करीत असतात. कारण आपण केवलज्ञानरुपी सूर्य उगवण्यासाठी अत्यंत उन्नत अशा उदयाचलाप्रमाणे आहात. याप्रमाणे स्तुती करुन इंद्राने बालकास ऐरावत हत्तीवर बसविले आणि इंद्राच्या इशा-यानुसार सर्व देवता-समूह मेरुपर्वताकडे निघाला. या मिरवणुकीची शोभा अवर्णनीय होती. स्वर्गातील देव बालतीर्थकाराचा जयजयकार करीत होते. कोणी त्यांच्यासमोर नाचत होते तर कोणी धुंद होऊन गात होते. सौर्धेन्द्राने बाल-तीर्थकरास

आपल्या कुशीत घेतले होते. सानत्कुमार व माहेंद्रस्वर्गातील इंद्र बालकावर चव-या ढाळीत होते. हे दिव्य दृश्य ज्यांनी पाहिले ते धन्य झाले. जे जीव सम्यक्‌दृष्टी होते त्यांची धर्मावरील श्रध्दा अधिकच दृढ झाली, तर जे मिथ्यादृष्टी होते त्यांचे मिथ्यात्व दूर होऊन ते सम्यग्दृष्टी झाले. सर्व जनतेच्या मनात कुतूहल निर्माण करीत व मिथ्यात्वींनी सम्यक्त्वी बनवीत, ही मिरवणूक मोठ्या वैभवाने नव्याण्णव हजार योजन उंच अशा सुदर्शन मेरु पर्वतावर पोहोचली. या पर्वतासच सुरगिरि असेही म्हणतात.

सुदर्शन-सुमेरु पर्वत या सोहळयाची तर वाटच पहात होता. आपल्या भद्रशाल, नंदन, सौमनस व पांडुक वनातील नित्यहरित वसंतऋतूसह तो स्वागताला सज्ज झाला होता. वनाच्या चारी दिशांना असलेली अकृत्रिम जिनचैत्यालये व त्यामधील यक्ष-यक्षिणी-सह १०८ जिनबिंबे बाल तीर्थकराची जणु आतुरतेने आगमन-प्रतिक्षा करीत होती. आपल्या सर्व परिवारासह इंद्र रमणीय व पवित्र अशा सुदर्शन मेरुपर्वतावर आला. त्याने बाल महावीराला पांडुकशिलेवरील मध्य सिंहासनावर विराजीत केले. ही पांडुकशिला वनात ईशान्य दिशेला असून ती अत्यंत पवित्र सुगंधीत, सुंदर व सिध्दशिलेप्रमणाणे वर्तुलाकार आहे. तिचा विस्तार शंभर योजने रुंद व आठ योजने उंच एवढा आहे. अनेक तीर्थकराच्या जन्मोत्सवामुळे अत्यंत पवित्र झाल्यामुळे देव नेहमी तिची पूजा करीत असतात. ही निसर्गतः उज्वल व धौत असली तरी देवांनी तिचे अनेक वेळा प्रक्षालन केले. मगच तिच्यावर बाल-महावीरांची पूर्वेकडे मुख करुन स्थापना केली. प्रभुंचा अभिषेक पाहण्यासाठी सर्व देव उत्सुक झाले होते. त्यांच्या गर्दीमुळे सर्व आकाश त्यांच्या विमानांनी व्याप्त झाले. सुदर्शन पर्वतावर विमानांच्या सावल्यांचा एकच खेळ सुरु झाला. अभिषेक पाहण्यासाठी देवतांची अशी गर्दी चालू असतानाच, मंगल वाद्ये निनादू लागली. घंटांचा ध्वनी आकाशात दुमदमू लागला. अप्सरांच्या पायातील नूपुरांचा छम् छम् ध्वनी सुरु झाला. गंधर्वकिन्नरांनी मधुर गायनाला सुरुवात केली. आकाशात जयजयकाराचा महान ध्वनी दुमदुमला. सौधर्म इंद्राने क्षीरसागरातील जलाने बाल- तीर्थकाराचा अभिषेक करण्यास सुरुवात केली. त्याच्या हातातील सुवर्ण-कुंभातील पहिली धार बालमहावीरांच्या मस्तकावर पडताच एक मोठा जयजयकार झाला. प्रभूंचा अभिषेक पाहून सर्व देवतांना धन्यता वाटली. अभिषेकाचा हा आनंददायक व रोमहर्षक सोहळा चालू असतानाच इंद्राच्या मनात शंका आली की, प्रभूचे शरीर तर अत्यंत लहान आहे. तेव्हा महान् कलशातील धारांनी त्यांना त्रास तर होत नसेल ना ! तथापि इंद्रची शंका अवधिज्ञानाने जाणताच बाल-प्रभूनी आपल्या पायाच्या आंगठयाने महान् सुदर्शन मेरुपर्वतास हालवून इंद्राच्या शंकेचे निरसन केले. त्यामुळे इंद्रानी त्यांना वीर नांव दिले. बालप्रभूंचा अभिषेक करुन देव बाजूला झाले. इंद्राणी अन्य देवीसह पुढे आली. तिने आपल्या हातानी बालप्रभूला जवळ घेतले. निरनिराळी उटणी, सुगंधीत द्रव्ये लावून त्यांनी बालतीर्थकराला मोठ्या आनंदाने अभिषिक्त केले.

नेहमी अत्यंत शांत असणारा सुदर्शनमेरु जिनेंद्रजन्माभिषेकाच्या वेळी देवांच्या धांदलीमुळे नुसता गजबजून गेला होता. एरवी झगमगत्या रत्नामुळे पिवळसर दिसणारा मेरु आता जिनभिषेकानंतर क्षीरसमुद्राच्या जलप्रवाहामुळे धवल दिसू लागला. अभिषेकानंतर सर्व देवदेवतांनी अत्यंत पवित्र व भवतापहारक असे गंधोदक शिरोधार्य केले. त्यानंतर श्री, शची, किर्ती आणि लक्ष्मी या देवीनी बालप्रभूस निरनिराळया प्रकारच्या अत्यंत सुंदर वस्त्रांनी आणि आभूषणांनी अलंकृत केले. यावेळी प्रभूचे सौंदर्य इतके अलौलिक दिसत होते की, दोन डोळ्यांनी तृप्तता होईना म्हणून इंद्राने हजार नेत्र उघडून समाधान करुन घेण्याचा प्रयत्न केला तरीही त्याचे समाधान झाले नाहीच. बाल-जिनेंद्रच्या सौंदर्याचे अवलोकन करतानाच इंद्राला त्यांच्या उजव्या पायाच्या तळव्यावर सिंहाचे चिन्ह दिसले. त्यावरुन त्याने भ. महावीराचे चिन्ह निश्चित केले. अशा प्रकारे मोठ्या वैभवाने बालप्रभूला अभिषिक्त केल्यानंतर इंद्रानी मोठया भक्तिभावाने प्रभूची स्तुती केली की, भगवान ! आपण संसाररुपी अंधकारात चाचपडणा-या आम्हा सर्वाना आत्मज्ञानाचा प्रकाश देणारे सूर्य आहात. संसारदुःखरुपी कूपामध्ये पडलेल्या आम्हाला सम्यक्तरुपी दोरीचा आधार देऊन आमचा उध्दार करणारे आपण आहात. वास्तविक पाहाता आपण स्वभावतःच पवित्र आहात. परंतु आम्ही हा जो आपणास अभिषेक केला किंवा आभूषणे चढविली आहेत ती केवळ आपणावरील भक्तिमुळेच ! आपणास आमचा नमस्कार असो ! स्तुती करुन इंद्र बाल-जिनेंद्राला घेऊन मोठ्या वैभवाने कुंडपुरीत परत आला. शचीने बालकाला त्रिशलामातेजवळ ठेवले आणि तिला मोहमयीनिद्रेतून जागृत केले. निद्रेतून जागृत झाल्यावर मातेने आपल्या शेजारी

वस्त्राभूषणांनी अलंकृत असे बालक पाहिले आणि तिला धन्यता वाटली. इंद्रदिदेवतांनी बाल-प्रभूंच्या माता-पित्याची स्तुती करुन त्रिजगदुध्दारक पुत्र लाभल्याबद्दल त्यांचे अभिनंदन करुन ते अमरपुरीला परतले.

प्रभूच्या जन्मामुळे कुंडपुरीतील जनतेसही अत्यंत आनंद झाला होता. रोज नृत्यगायनादिमार्गानी ते आपला आनंद व्यक्त करीत होते. जन्माच्या दहाव्या दिवशी प्रभूचा नामकरणमहोत्सव होता. त्या दिवसाचा सोहळा काही आगळाच होता. सिध्दार्थ महाराजांनी देशोदेशीच्या आपल्या राजेमित्रांना बोलाविले होते. कुंडपुरीतील नागरिकांचे बांधवजनही हा सोहळा पाहण्यासाठी आले होते. या सोहळ्यासाठी स्वर्गातील देवताही पृथ्वीतलावरच आल्या होत्या. सारे कुंडपुर शहर गुढ्यातोरणांनी सुशोभित केले होते. रस्त्यावर सडे घालून सुंदर रांगोळया काढण्यात आल्या होत्या. सर्व नागरिक अत्यंत उल्हासित होऊन वस्त्राभूषणांनी नटले होते. नंद्यावर्त प्रासाद तर अतिथींनी नुसता गजबजून गेला होता. अतिथींची व्यवस्था करता करता सेवकांची त्रेधा उडाली होती. राजस्त्रियांच्या व दासींच्या वस्त्रांची सळसळ, रत्न-कंकणाची किणकिण व नूपूरांची रुणझुण यामुळे वातावरण अगदी प्रफुल्लित झाले होते, सारा महाल रत्नदीपांनी उजळून निघाला होते. आनंदाला कुठेही वाण नव्हती. नंद्यावर्त महालातील त्रिशलाराणीच्या कक्षाचे तर काय वर्णन करावे. जिकडे तिकडे रत्नदीप झगमगत होते. मध्यभागी रेशमी दो-यांच्या सहाय्याने अवर्णनीय नक्षीकाम केलेला सुवर्णाचा पाळणा झ ुलत होता. निरनिराळ्या प्रकारची रत्ने बसविलेल्या या पाळण्यात मऊ परांची गादी होती. त्या गादीवर तिन्ही जगाचा उध्दार करणारे बाळ-जिनेंद्र नेत्राने जगाकडे पहात आपले इवलेसे पाय नाचवित पडले होते.

बाळाचे नाव काय ठेवायचे ! जमलेल्या नारी निरनिराळी नावे सूचवू लागल्या. त्रिशला मातेला विचाारले तेव्हा तिने सिध्दार्थ राजाला काय ठेवायचे म्हणून सिध्दार्थ राजाला विचारु लागली. सिध्दार्थ राजाने क्षणभर विचार केला. बाल-जिनेंद्र त्रिशला राणीच्या गर्भात आल्यापासून आपल्या कुळाचे वैभव दिवसेंदिवस शुक्लपक्षातील चंद्रकलेप्रमाणे वर्धमान होत गेले आहे, म्हणून त्याने बाळाचे नाव वर्धमान ठेवा म्हणून सांगितले. दासीने परत येऊन राजाची इच्छा कळविली. मोठ्या थाटामाटाने बाळाचे नाव वर्धमान ठेवण्यात आले. नामकरणविधीच्या वेळी स्वर्गातील अप्सरा व कुंडपुरातील स्त्रिया नर्तन करीत होत्या. सर्व वातावरण निरनिराळया वाद्यांच्या व नूपुरांच्या आवाजांनी गजबजून गेले होते. इतर देव व गंधर्वही या नृत्यगायनात सामील झाले होते. अशा प्रकारे अत्यंत आनंदाने व थाटामाटाने , वैभवाने बाळ-प्रभूचा नामकरण विधी पार पडला. ज्यांनी आपल्या नेत्रांनी हा सोहळा पाहिला त्यांचे नेत्र व जीवन धन्य झाले. जन्मभिषेकाच्या वेळीच प्रभूंचे अफाट सामर्थ्य पाहून इंद्रनी बालकाचे नाव वीर ठेवले होते. आता त्याचे नाव वर्धमान झाले. प्रभूंच्या गर्भावतरणापासून कुंडपुरात देवतांची ये-जा चालू होती. आता आता जन्मोत्सवानंतर येण्याचे प्रयोजन संपले म्हणून सर्व देव आपापल्या ठिकाणी निघून गेले. जाताना इंद्राने काही योग्य व श्रेष्ठ देवकुमारांना बाळ-प्रभूंच्या सेवेसाठी ठेवले.
त्रिशलामातेच्या उदरात गर्भाची जसजसी वाढ होऊ लागली तसतसी कुंडपुरीतही सगळीकडे सुंदर सुंदर वने दिसू लागली. वृक्ष बहरलेले राहू लागले. सरोवरे स्वच्छ व शीतलजलांनी भरलेली राहू लागली. कुंडपुरीतील वातावरण नेहमी अत्यंत प्रसन्न राहू लागले. कुंडपुरीचा सर्वांगीण नूरच पालटून गेला. म्हणूनच राजा सिध्दार्थाने बालकाचे वर्धमान हे यथार्थ नाव ठेवले. नामकरणविधीसाठी आलेली प्रजा हर्षाने राजवाडयातून परत फिरली. परत जाताना प्रत्येक व्यक्ति म्हणे अशा भाग्यवान पुत्राला जन्म देणारी धन्य ती त्रिशलामाता ....